अमरावती-नागपूर-चंद्रपूर-वर्धा-यवतमाळ-अकोला-वाशिम-बुलढाणा-खामगांव

Postal Lic./AMT/RNP/492/2026-2028

वरुड । गुरुवार
१७.०९.२०२६

वरुड
# दर्पण
जनसामान्यांच्या मनातील आरसा

RNI REGD.NO.MAHMAR/2019/78235

chandubhad@gmail.com

www.waruddarpan.com

9422157712, 8669533485

वर्षः ०७ | अंकः २२९ | पृष्ठे: ०६ | किंमत: ०२

संपादक - चंद्रकांत भा. भड

+91 7745067712

## वडनगरहून उठलेल्या ठिणगीने संपूर्ण भारतात क्रांती घडवली

### प्रधानमंत्री मोदींच्या २५ वर्षांच्या सेवायात्रेचा गौरव : उपमुख्यमंत्री शिंदे

(प्रतिनीधी वरुड दर्पण)



**वडनगर** – प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांच्या जन्मदिनानिमित्त आणि त्यांच्या सार्वजनिक जीवनातील २५ वर्षांच्या यशस्वी सेवापूर्तीला अभिवादन करण्यासाठी गुजरातधील वडनगर येथून राष्ट्रव्यापी 'सेवा संकल्प अभियाना'चा भव्य शुभारंभ करण्यात आला.

याप्रसंगी महाराष्ट्राचे उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी शिवसेना आणि महाराष्ट्र शासनाच्या वतीने प्रधानमंत्री मोदींना जन्मदिनाच्या मनःपूर्वक शुभेच्छा दिल्या. वडनगरच्या पवित्र भूमीला नमन करताना उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी हा आपल्यासाठी अत्यंत अभिमानाचा क्षण असल्याचे सांगितले. वडनगरच्या मातीतून उमटलेला एका बालकाचा आवाज आज देशातच नव्हे, तर जगभर घुमत आहे. वडनगर ते वाराणसी हा प्रवास केवळ भौगोलिक प्रवास नसून सेवेपासून समर्पण, संकल्पापासून परिवर्तन आणि परिवर्तनापासून विकसित भारताकडे जाणारी एक ऐतिहासिक वाटचाल आहे, असे गौरवोद्गार त्यांनी काढले.

**२५ वर्षांचा अविरत सेवाकाळ आणि कर्तृत्वाची उंची**

प्रधानमंत्री मोदींच्या सार्वजनिक जीवनातील २५ वर्षांच्या प्रवासात पदे आणि जबाबदाऱ्या बदलल्या, परंतु त्यांचा 'सेवेचा संकल्प' कधीही बदलला नाही, असे स्पष्ट करत शिंदे म्हणाले की, मोदींच्या बाबतीत वयाचे आकडे नव्हे तर कर्तृत्वाची उंची मोजली जाते.

ती हिमालयाच्या उंचीने आणि जनतेप्रती असलेल्या कार्याची खोली अरबी समुद्राने मोजावी. गॅस, पक्की घरे, बँक खाती आणि नळाचे पाणी यांसारख्या योजनांमुळे विकास थेट सामान्य माणसाच्या जीवनाशी जोडला गेला आहे. विकसित भारताचा संकल्प

**२०४७ च्या विकसित भारताची नवी दिशा**

"महात्मा गांधी व सरदार पटेल यांच्या गुजरातमधून स्वातंत्र्याचे आंदोलन उभे राहिले होते, त्याच भूमीतून प्रधानमंत्री मोदींनी विकसित भारताचे ध्येय जनआंदोलन बनवले आहे. आर्थिकदृष्ट्या मजबूत, तंत्रज्ञानसक्षम आणि आत्मनिर्भर भारत घडविण्याच्या या प्रवासात वडनगरची ही ठिणगी आता संपूर्ण भारताची क्रांती बनली आहे, असा दृढ विश्वास एकनाथ शिंदे यांनी व्यक्त केला.

आणि राष्ट्रीय प्रगती आर्थिक भरभराट: भारत जगातील १० व्या क्रमांकावरून चौथ्या क्रमांकावर पोहोचला असून लवकरच तिसऱ्या क्रमांकाची अर्थव्यवस्था बनण्याचा संकल्प आहे.

## छत्तीसगडमधील 'झीरम घाटी' नक्षलवादी हल्ला प्रकरणात १० दोषी नक्षलवाद्यांना फाशीची शिक्षा

**काँग्रेस नेत्यांसह २९ जणांचा झाला होता मृत्यू**

(प्रतिनीधी वरुड दर्पण)



**मुंबई** – छत्तीसगडमधील नक्षलवाद संदर्भात एक मोठी बातमी समोर आली आहे. छत्तीसगडमधील २५ मे २०२६ च्या 'झीरम घाटी' नक्षलवादी हल्ला प्रकरणात जगदलपूर एनआयएच्या विशेष न्यायालयाने १० दोषी नक्षलवाद्यांना फाशीची शिक्षा सुनावली आहे. काल म्हणजेच १६ सप्टेंबर २०२६ रोजी या प्रकरणी सुनावणी असून १० दोषी नक्षलवाद्यांना फाशीची शिक्षा सुनावली आहे.

५ सप्टेंबर रोजी जगदलपूर येथील विशेष 'एनआयए' न्यायालयाने २०१३ च्या या अत्यंत भयावह आणि गाजलेल्या नक्षलवादी हल्ल्यात या प्रकरणात १० नक्षलवाद्यांना दोषी ठरवले होते. मात्र तेव्हा शिक्षा सुनावली नव्हती. अशातच काल सर्व दोषींना मृत्युदंड सुनावले गेले आहे.

छत्तीसगडमधील सुकमा जिल्ह्यातील 'दरभा' पोलीस स्टेशन अंतर्गत 'झीरम घाटीत २५ मे २०१३ रोजी काँग्रेसच्या 'परिवर्तन यात्रेवर नक्षलवाद्यांनी घेरून हल्ला केला होता. हल्ल्याच्या वेळेला तिथे २०० पेक्षा जास्त नक्षलवादी उपस्थित होते, असे नंतरच्या तपासात समोर आले होते. नियोजनबद्ध पद्धतीने काँग्रेस नेत्यांच्या ताफ्याला चारही बाजूने घेरून बेछूट गोळीबार करण्यात आला होता. तर ताफा थांबवण्यासाठी पहिल्या वाहनाच्या जवळ भूसुरुंग स्फोट करण्यात आला होता. त्या हल्ल्यामध्ये वरिष्ठ काँग्रेस नेत्यांसह सुरक्षा दलाचे अनेक जवान अशा २९ जणांचा मृत्यू झाले होते. ३० पेक्षा जास्त लोक जखमी ही झाले होते.

त्या दिवशीचा हल्ला भारतात झालेल्या नक्षलवादी हल्ल्यांमधील सर्वाधिक भीषण हल्ल्यांपैकी एक मानला जातो. त्याच प्रकरणी आता एनआयएच्या विशेष न्यायालयाने दहा नक्षलवाद्यांना दोषी ठरवत मृत्यु दंडाची शिक्षा सुनावली आहे.

## थोडक्यात

### निबंधकांच्या मंजुरीनंतरच जन्म, मृत्यू नोंदणी रद्द : दुरुस्तीसाठी नवे कडक नियम

(प्रतिनीधी वरुड दर्पण)

**मुंबई** – जन्म व मृत्यू नोंदवहीतील नोंदींमध्ये दुरुस्ती किंवा रद्दबातल करण्यासाठी महाराष्ट्र शासनाने नवी सविस्तर मार्गदर्शक तत्त्वे जारी केली आहेत. यानुसार मुख्य निबंधकांच्या मंजुरीशिवाय कोणत्याही जन्म किंवा मृत्यूच्या नोंदी रद्द करता येणार नाहीत. दुरुस्ती करण्यापूर्वी संबंधित व्यक्तीकडून लेखी अर्ज घेऊन मूळ कागदपत्रांची पडताळणी करणे बंधनकारक करण्यात आले आहे. केवळ शुद्धलेखन लेखनातील त्रुटी असल्यास आवश्यक पुराव्यांच्या आधारे दुरुस्ती करता येईल. मात्र मूळ नोंदीत बदल न करता त्याची नोंद 'शेरा' स्तंभात करावी लागणार आहे.

## उपमुख्यमंत्री शिंदेंच्या हेलिकॉप्टरमध्ये अचानक तांत्रिक बिघाड : उड्डाण रद्द

(प्रतिनीधी वरुड दर्पण)



**अहमदाबाद** – महाराष्ट्राचे उपमुख्यमंत्री आणि शिवसेनेचे मुख्य नेते एकनाथ शिंदे सध्या गुजरात दौऱ्यावर आहेत. या दौऱ्यादरम्यान त्यांच्या हेलिकॉप्टरमध्ये तांत्रिक बिघाड झाल्याची माहिती समोर आली आहे.

वडनगरहून अहमदाबादला जाण्यापूर्वी हेलिकॉप्टरमध्ये काही तांत्रिक अडचण आढळून आली. त्यामुळे हेलिकॉप्टरचे उड्डाण रद्द करण्यात आले आणि शिंदे रस्तेमार्गे अहमदाबादच्या दिशेने रवाना झाले. उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे गुरुवारी वडनगरमध्ये आयोजित कार्यक्रमासाठी उपस्थित होते. पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या वाढदिवसानिमित्त आयोजित 'सेवा संकल्प अभियाना'च्या कार्यक्रमात शिंदे सहभागी झाले. यावेळी केंद्रीय गृहमंत्री अमित शाह, गुजरातचे मुख्यमंत्री भूपेंद्र पटेल यांच्यासह अनेक नेते उपस्थित होते.

## कृषी उत्पन्न बाजार समित्या रोजगार निर्मितीचे केंद्र बनवणार

(प्रतिनीधी वरुड दर्पण)

### पणन मंत्री जयकुमार रावल यांचे प्रतिपादन



**धुळे** – कृषी उत्पन्न बाजार समित्या केवळ शेतमालाच्या खरेदी-विक्रीचे केंद्र न राहता रोजगारनिर्मिती, व्यापारवृद्धी आणि स्थानिक अर्थव्यवस्थेला चालना देणारी महत्त्वाची केंद्रे म्हणून विकसित करण्याचा राज्य शासनाचा प्रयत्न आहे. शेतकऱ्यांच्या मुलांना केवळ रोजगार शोधणारे नव्हे, तर रोजगार देणारे उद्योजक बनविण्यासाठी बाजार समित्यांनी पुढाकार घ्यावा, असे आवाहन पणन मंत्री जयकुमार रावल यांनी केले. राज्यात २९ सप्टेंबर २०२६ रोजी एकाच दिवशी, एकाच वेळी सुमारे एक हजार ठिकाणी 'पंडित दीनदयाल उपाध्याय रोजगार महाकुंभ' आयोजित करण्यात येणार आहे. या महाकुंभात राज्यातील सुमारे २०० कृषी उत्पन्न बाजार समित्या सहभागी होणार आहेत. युवकांना रोजगार, व्यवसाय आणि कौशल्यविकासाच्या संधी उपलब्ध करून देण्यासाठी विविध उपक्रम राबविण्यात येणार आहेत. या पार्श्वभूमीवर रावल यांनी राज्यातील बाजार समित्यांच्या सभापतींशी दूरदृश्य प्रणालीद्वारे बैठक घेऊन पूर्वतयारीचा आढावा घेतला.

## शिरपूर - चोपडा रस्त्यावर भीषण अपघात, चार मजुर ठार

(प्रतिनीधी वरुड दर्पण)




**धुळे** – शिरपूर-चोपडा मार्गावरील सावेर गावाच्या शिवारात भीषण अपघात घडला आहे. भरधाव मालमोटारीने मोटारसायकलला समोरून जोरदार धडक दिल्याने चार जणांचा मृत्यू झालाय.

हे चारही जण मध्य प्रदेशातील असून लुमरीया लालसिंग भिलाला (२५) व इसराम कालू भिलाला (४८, दोन्ही रा. बुद्रा, ता. राजपूर, जि. बडवानी), सुरेश रमेश कनासे (२६) आणि महेश लालसिंग कनासे (३१, रा. बालिया, ता. सनावद, जि. खरगोन, मध्य प्रदेश) अशी अपघातात ठार झालेल्या व्यक्तींची नावे आहेत. अपघातानंतर मालमोटार चालक घटनास्थळावरून पसार झाला आहे. पन्नालाल कालूराम सिसोदिया यांनी थाळनेर ठाणे पोलीस ठाण्यात तक्रार दिली आहे.

तक्रारीनुसार इसराम भिलाला हे या तिघांना सोबत घेऊन मोटरसायकल (क्र. एमपी-१०-झेडएन-३२२६) वरुन शिरपूरकडून चोपड्याकडे जात होते. १३ सप्टेंबर रोजी सायंकाळी साडेसहा वाजेच्या सुमारास सावेर गावाच्या शिवारात (ता.शिरपूर) चोपड्याकडून शिरपूरच्या दिशेने भरधाव वेगाने येणाऱ्या मालमोटारीने (क्र. एचआर-५५-एटी-१३५५) मोटारसायकलला समोरून जोरदार धडक दिली.

धडक इतकी भीषण होती की, मोटारसायकलवरील चौघांनाही गंभीर दुखापत झाली. अपघातानंतर मालमोटार चालक घटनास्थळावरून पसार झाला. दरम्यान, जखमींना तातडीने शिरपूर आणि धुळे येथील रुग्णालयात हलविण्यात आले. मात्र उपचारादरम्यान चौघांचा मृत्यू झाला.

## शाळेतून घरी येताना कुटुंबावर काळ ओढावला : चिमुरडीसह वडिलांचा मृत्यू, आई गंभीर जखमी

(प्रतिनीधी वरुड दर्पण)



**सांगली** – सांगलीतील तासगाव मणेराजुरी रस्त्यावर भीषण अपघाताची घटना घडली आहे. रस्त्याच्या कडेला थांबलेल्या पिकअपला दुचाकीने मागून जोराची धडक दिली.

ही धडक इतकी भीषण होती की या अपघातात चिमुरडीसह वडिलांचा जागीच मृत्यू झालाय. सागर बाबुराव जाधव (वय ३७) आणि हर्षिता सागर जाधव (वय ५)अशी मृतांची नावे आहेत. तर आई सोनाली या गंभीर जखमी असून त्यांच्यावर उपचार सुरू आहेत. गंभीर जखमी असलेल्या सोनाली जाधव या मणेराजुरी येथील एका शाळेत शिक्षिका आहेत. पत्नीला आणण्यासाठी सागर जाधव हे मुलगी हर्षिताला घेऊन दुचाकीवरून निघाले होते. शाळेतून परत येत असताना वासुंबे हद्दीतील ब्रह्मनाथ मंदिराजवळ थांबलेल्या पिकअपला दुचाकीने मागून धडक दिली. दुचाकीने दिलेली ही धडक इतकी भीषण होती की सागर आणि हर्षिता यांचा घटनास्थळीच मृत्यू झाला. तर आई सोनाली यांच्या डोक्याला मार लागला.



# सालबर्डीच्या कुशीत फुलला ग्रामगीतेचा विचार : गुरुदेव सेवा मंडळाचे दोन दिवसीय शिबिर

(प्रतिनीधी वरुड दर्पण)



**वरुड** – सातपुड्याच्या निसर्गरम्य कुशीत, श्रीक्षेत्र सालबर्डीच्या आध्यात्मिक वातावरणात राष्ट्रसंत तुकडोजी महाराजांच्या विचारांचा जागर घडवून आणणारे दोन दिवसीय चिंतन शिबिर उत्साहात पार पडले. आष्टी तालुका गुरुदेव सेवा मंडळाच्या वतीने आयोजित या निवासी शिबिरात तालुक्यातील गुरुदेव भक्तांनी सहकुटुंब मोठ्या संख्येने सहभाग घेतला.

शिबिराच्या माध्यमातून आध्यात्मिक चिंतनासोबतच कुटुंब, समाज आणि राष्ट्रनिर्मितीचा विचार उपस्थितांपर्यंत पोहोचविण्यात आला. सामुदायिक प्रार्थना, ध्यान, चिंतन तसेच विविध विषयांवरील मार्गदर्शनामुळे संपूर्ण परिसर भक्तिमय आणि सकारात्मक ऊर्जेने भारावून गेला.

आष्टी तालुका गुरुदेव सेवा मंडळाचे सेवाधिकारी तारेश बोडखे, ग्रामगीताचार्य प्रा.विनोद पेठे आणि राष्ट्रीय किर्तनकार ह.भ.प.गजानन महाराज भोरे, प्रमोद कापसे यांच्या मार्गदर्शनाखाली विविध उपक्रम घेण्यात आले. विशेषतः शिबिर कौटुंबिक स्वरुपाचे असल्याने महिलांनी मोठ्या उत्साहाने सहभाग घेतला. दररोज पहाटेपासून सामुदायिक प्रार्थना, ध्यान, चिंतन आणि आध्यात्मिक कार्यक्रमांना सुरुवात करण्यात येत होती. यामुळे शिबिरार्थींना मानसिक शांततेसोबतच सकारात्मक ऊर्जा आणि राष्ट्रसंतांच्या विचारांनुसार जीवन जगण्याची प्रेरणा मिळाली. यावेळी वर्धा जिल्हा सेवाधिकारी प्रभाकर गायकवाड, सहकार महर्षी राहुल ठाकरे, प्रा.डॉ.सुभाष लोहे, प्रतीक्षा उमरकर, प्रतिभा घाटोळ, साक्षी बेले, प्रा.अरविंद राठोड, रविंद्र मानव, प्रल्हाद बुले यांनीही मार्गदर्शन केले.

'गाव तेथे ग्रामगीता' अभियानाचा निर्धार आष्टी तालुका गुरुदेव सेवा मंडळाच्या वतीने मराठवाडा विभागात राष्ट्रसंत प्रचार यात्रा काढून 'गाव तेथे राष्ट्रसंतांची ग्रामगीता' हे अभियान राबविण्याचा निर्धार यावेळी व्यक्त करण्यात आला.

९१ वर्षांनंतर पुन्हा सालबर्डीत विचारांचा जागर श्रीक्षेत्र सालबर्डीच्या याच आध्यात्मिक भूमीत सन १९३५ मध्ये राष्ट्रसंत तुकडोजी महाराजांनी महारुद्र यज्ञाचे आयोजन केले होते. ९१ वर्षांनंतर आष्टी तालुका गुरुदेव सेवा मंडळाच्या वतीने या पावन यज्ञ भूमीत कौटुंबिक चिंतन शिबिराचे आयोजन करण्यात आले.

त्यामुळे या शिबिराला विशेष ऐतिहासिक आणि आध्यात्मिक महत्त्व प्राप्त झाले. शिबिराच्या माध्यमातून गुरुदेव सेवा मंडळाच्या कार्यकर्त्यांमध्ये नवचैतन्य निर्माण झाले असून राष्ट्रसंतांच्या विचारांचे कार्य अधिक व्यापक करण्यासाठी नवी ऊर्जा मिळाली आहे.

# ॲडिडासकडून मोठ्या कर्मचारी कपातीची घोषणा : भारतातील ३५० हून अधिक कर्मचाऱ्यांच्या नोकऱ्या धोक्यात

(प्रतिनिधी वरुड दर्पण)




**नवी दिल्ली** – सध्या अनेक कंपन्यांमध्ये कर्मचारी कपात सुरू असल्याचे चित्र आहे. अशातच अनेक मोठ्या कंपन्यांनी अलीकडेच आपल्या कर्मचाऱ्यांना कामावरून काढून टाकले आहे. जर्मनीची प्रसिद्ध स्पोर्ट्सवेअर कंपनी ॲडिडासनं गुरुग्राममधील आपल्या इंडिया टेक हबमधील तब्बल ५० टक्के कर्मचाऱ्यांना कामावरून कमी केल्याची माहिती आहे. या हबमध्ये काम करणाऱ्या एकूण ७०० पैकी ३०० ते ३५० सॉफ्टवेअर इंजिनिअर्स आणि डेटा सायंटिस्ट यांच्या नोकऱ्यांवर मोठा परिणाम झाला आहे. दरम्यान प्रभावित झालेल्या सर्व कर्मचाऱ्यांना नवीन संधी शोधण्यासाठी योग्य ते सहकार्य करणार असल्याचंही कंपनीनं सांगितलंय, वोकल्टच्या अहवालानुसार, या कर्मचारी कपातीचा परिणाम अंदाजे ३५० किंवा त्याहून अधिक कर्मचाऱ्यांवर होऊ शकतो.

## महसूल वाढीसाठी वित्त समितीची स्थापना

# समितीच्या अध्यक्षपदी डॉ.विजय केळकर यांची नियुक्ती

(प्रतिनिधी वरुड दर्पण)



**मुंबई** – २०३० पर्यंत राज्याची अर्थव्यवस्था एक ट्रिलियन डॉलर करण्याचे उद्दिष्ट ठेवलेल्या राज्य सरकारने कर आणि बिगरकर महसुलात वाढ करण्यासाठी 'महाराष्ट्र शाश्वत सार्वजनिक वित्त समिती' गठीत केली आहे. ज्येष्ठ अर्थतज्ज्ञ डॉ.विजय केळकर यांच्या अध्यक्षतेखाली गठीत करण्यात आलेल्या या समितीत पाच तज्ज्ञांचा समावेश आहे. राज्याच्या वस्तू आणि सेवा कर विभागाचे सह आयुक्त एस. षण्मुगराजन हे या समितीचे निमंत्रक आहेत. समितीला कालबद्ध शिफारशींसह अहवाल सादर करण्यासाठी सहा महिन्यांची मुदत देण्यात आली आहे. वित्त विभागाने बुधवारी याबाबतचा शासन निर्णय जारी केला. जवळपास साडेनऊ लाख कोटीचे कर्ज डोक्यावर असलेल्या राज्य सरकारने 'विकसित महाराष्ट्र ऽ २०४७' हे संकल्पचित्र स्वीकारले आहे. त्यासाठी पायाभूत सुविधा, मनुष्यबळ विकास, जलसुरक्षा, नागरी व्यवस्था आणि ऊर्जा संक्रमण यासाठी मोठ्या प्रमाणावर सार्वजनिक गुंतवणूक आवश्यक आहे.

# दिल्ली आंदोलन चौकशी समिती बदलण्यास सर्वोच्च न्यायालयाचा नकार

(प्रतिनीधी वरुड दर्पण)



**नवी दिल्ली** – नीट परीक्षा गैरव्यवहाराविरोधात 'कॉकरोच जनता पार्टी'च्या नेतृत्वाखाली झालेल्या आंदोलनादरम्यान विद्यार्थ्यांवर झालेल्या पोलीस अत्याचारांची चौकशी करण्यासाठी स्थापन केलेली ५ सदस्यीय उच्चस्तरीय समिती पुनर्रचित करण्यास सर्वोच्च न्यायालयाने स्पष्ट नकार दिला आहे. समितीवरील सर्व आरोप हे केवळ तर्कवितर्क आणि पूर्वग्रहदूषित संकल्पनांवर आधारित आहेत, असे निरीक्षण न्यायालयाने नोंदवले आहे. सरन्यायाधीश सूर्य कांत, न्या. जॉयमाल्य बागची आणि न्या. व्ही. मोहना यांच्या खंडपीठाने हा निर्णय दिला. १० सप्टेंबर रोजी दिलेला हा आदेश मंगळवारी प्रसिध्द करण्यात आला.

आदेशात सर्वोच्च न्यायालयाने म्हटले की, ही समिती पूर्णपणे निष्पक्षता, पारदर्शकता आणि तटस्थ दृष्टिकोन ठेवून न्यायालयाला सहकार्य करण्यासाठी स्थापन करण्यात आली आहे. कोणत्याही एका पक्षाची बाजू मांडण्यासाठी या समितीची निर्मिती झालेली नाही. चौकशी सुरू होण्यापूर्वीच केवळ गृहीतके आणि पूर्वग्रहांच्या आधारे केलेल्या याचिकांवरून समितीच्या रचनेत कोणताही बदल केला जाणार नाही.

## ढगाच्या स्वामी विवेकानंद मानवता गुरुकुलमध्ये

# तान्हा पोळा व वेशभूषा स्पर्धा उत्साहात संपन्न



(प्रतिनिधी वरुड दर्पण)

**वरुड** – शेतकऱ्यांचा जिव्हाळ्याचा सण असलेल्या पोळा सणाचे औचित्य साधून कलाजीवन बहुउद्देशीय संस्था द्वारा संचालित स्वामी विवेकानंद मानवता गुरुकुल, ढगा येथे 'तान्हा पोळा' महोत्सवाचे भव्य आयोजन करण्यात आले होते.

गुरुकुलाच्या वतीने दरवर्षी या उपक्रमाचे आयोजन केले जाते. यावर्षीही चिमुकल्यांच्या उत्स्फूर्त सहभागाने गुरुकुलचा परिसर उत्सवमय झाला होता.

या महोत्सवात पारंपारिक वेशभूषा स्पर्धा आणि नंदी बैल सजावट स्पर्धा घेण्यात आली होती. स्पर्धेसाठी गुरुकुलातील सर्व छोट्या-छोट्या विद्यार्थ्यांनी आपापल्या घरी असलेल्या मातीच्या नंदी बैलांना रंगीबेरंगी झुली, शिंगांना बेगड, गळ्यात घुंगरांच्या माळा लावून अतिशय सुंदर सजावट केली होती तर अनेक विद्यार्थी-विद्यार्थिनींनी स्वतः शेतकरी, महिला शेतकरी यांनी अशा पारंपारिक वेशभूषेत सजून गुरुकुलात हजेरी लावली होती. या कार्यक्रमाच्या उदघाटक म्हणुन ढगाचे पोलीस पाटील भूषण गोहत्रे होते तर प्रमुख पाहुणे म्हणुन रंजित इंगोले, संस्थाध्यक्ष युवराज ठाकरे, मुख्याध्यापक नितीन ठाकरे उपस्थित होते.

कार्यक्रमाचे संचालन कविता वंजारी तर कार्यक्रमाच्या यशस्वितेसाठी ऋतुजा घोरमाडे, हर्षा वंजारी, रुपाली बघेल, उदय घोरमाडे, ज्योती शेंडे या शिक्षकांनी अथक परिश्रम घेतले.



## शिक्षक दिनाचे औचित्य साधुन शांतिनिकेतन इंग्रजी शाळेत

# विद्यार्थांनी अनुभवली शिक्षकांची भुमिका

(प्रतिनिधी वरुड दर्पण)




**वरुड** – शिक्षक दिनाचे औचित्य साधुन येथील शांतिनिकेतन इंग्रजी शाळेच्या स्वयंशासित विद्यालयात वर्ग दहावीच्या विद्यार्थ्यांनी शिक्षक दिनाचा आगळा वेगळा आणि उत्साह पूर्ण कार्यक्रम आयोजित केला.

विद्यार्थ्यांनी शिक्षकांच्या भूमिका साकारात एक दिवसासाठी शाळेचे सूत्रसंचालन व अध्यापनाची जबाबदारी पार पाडली. या कार्यक्रमासाठी वर्गशिक्षिका ज्योती श्रीखंडे यांचे मार्गदर्शन लाभले.

विशेष म्हणजे मुख्याध्यापक विवेक ठवळी यांच्या भूमिकेत वर्ग दहावीचा विद्यार्थी अब्दुल काशीफ वाहिद तर उपमुख्याध्यापिका शालिनी देशमुख यांच्या भूमिकेत प्राची दिनेश शेळके हिने प्रभावीपणे भूमिका साकारली. त्यांच्या अभिनयाला उपस्थित शिक्षक विद्यार्थ्यांनी उत्स्फूर्त दाद दिली.

या प्रसंगी अनेक विद्यार्थी शिक्षकांच्या भूमिकेत सहभागी झाले. विद्यार्थ्यांनी शिक्षकांसाठी विविध मनोरंजन, गेम्स व उपक्रमाचे आयोजन करुन शिक्षक दिनाचा आनंद द्विगुणीत केला. शिक्षकांसाठी आयोजित केलेल्या खेळांमध्ये शिक्षकांनीही उत्स्फूर्त सहभाग घेतला.

कार्यक्रमाचे संचालन अक्षरा वानखडे आणि लावण्या चौधरी यांनी केले. विद्यार्थ्यांनी शिक्षकांच्या भूमिकेतून शिस्त, जबाबदारी आणि अध्यापनाचे महत्त्वपूर्ण अनुभवले. या अभिनव उपक्रमातून विद्यार्थ्यांच्या नेतृत्वगुणांना सर्जनशीलतेला सुंदर व्यासपीठ मिळाले.

कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी उपमुख्याध्यापिका शालिनी देशमुख, वर्ग शिक्षिका ज्योती श्रीखंडे, सर्व शिक्षक व शिक्षकेत्तर कर्मचाऱ्यांचे सहकार्य लाभले.

## न्यू ऑरेंज सिटी कॉन्व्हेंटमध्ये

# पोळा सनानिमित्त बैल सजावट स्पर्धा उत्साहात

(प्रतिनीधी वरुड दर्पण)



**वरुड** – न्यू ऑरेंज सिटी कॉन्व्हेंट येथे पोळा सणानिमित्त विद्यार्थ्यांसाठी बैल सजावट स्पर्धेचे आयोजन करण्यात आले.

या कार्यक्रमाकरिता प्रमुख पाहुणे म्हणुन पालक शिक्षक संघाचे सदस्य उपस्थित होते . प्रांजली रितेश देशमुख व अमोल बेले, अजित कुमार सोनारे, प्राचार्य माधुरी भोंडे, समन्वयक श्वेता गणोरकर, प्री प्रायमरीचे कॉर्डिनेटर पराग भोंडे, पी.आर.ओ किशोर देशमुख उपस्थित होते .

सर्वप्रथम सरस्वती प्रतिमेचे पूजन करण्यात आले. या उपक्रमात विद्यार्थ्यांनी पारंपरिक वेशभूषा, रंगीबेरंगी सजावट आणि आकर्षक बैलांच्या प्रतिकृती तयार करून सहभाग घेतला.

विद्यार्थ्यांनी उत्साहाने सहभाग घेत महाराष्ट्राच्या ग्रामीण संस्कृतीची व पोळा सणाची परंपरा जपण्याचा संदेश दिला. वर्ग नर्सरी मधून प्रथम शौर्य खड़से, द्वितीय रुआँशी पठारे, तृतीय राम चौधरी, भार्गवी शिंदे तसेच के.जी.वन मोटू पतलू या वर्गातून प्रथम मंथन लांडगे, द्वितीय धिमीरा जवंजाळ, तृतीय राजवीर बहुरूपी व ग्रीष्मा परीहार तसेच के.जी वन मिकी माऊस या वर्गामधून प्रथम हृदयान शिनकर, द्वितीय पारस शेळके, तृतीय प्रियांशी उमाळे, हृदियांश माटे तसेच केजी टू डोरेमॉन मधून प्रथम वंशिका डाके, द्वितीय अन्वी बेले, तृतीय कबीर श्रीराव, चतुर्थी देशमुख तसेच केजी टू टॉम अँड जेरी मधून प्रथम प्रियांश वरठी, द्वितीय भावी सोनारे, तृतीय वीवांश गावंडे, स्मित वानखडे अशा प्रकारे क्रमांक देऊन त्यांना बक्षीस देऊन त्यांचा गौरव करण्यात आला. कार्यक्रमाचे संचालन व आभार उज्वला बहुरुपी यांनी मानले. या उपक्रमाबद्दल संचालक मंडळाचे अध्यक्ष डॉ.राम गोधने, माजी अध्यक्ष गोपाल वानखडे, उपाध्यक्ष सुधाकर ठाकरे, सचिव अनिल गुल्हाने, सहसचिव शाम खंडेलवाल, कोषाध्यक्ष डॉ.वेदांत राजोरिया, सदस्य विनय यावलकर आदी मान्यवरांनी विद्यार्थ्यांचे भरभरून कौतुक केले. शाळेतील सर्व शिक्षक व शिक्षकेत्तर कर्मचारी इत्यादी सर्वांचे या कार्यक्रमाच्या यशस्वितेकरिता मोलाचे सहकार्य लाभले.

शाळेच्या मुख्याध्यापक, शिक्षक व विद्यार्थ्यांच्या उत्स्फूर्त सहभागामुळे हा उपक्रम आनंददायी आणि संस्मरणीय ठरला.

# संपादकीय

**स्वत:वर विश्वास ठेवा, अर्धे युद्ध तुम्ही तिथेच जिंकता.**

## ध्यानसाधना व व्यक्तिमत्त्व विकास शिबिर : अंतर्मनाला नवी दिशा देणारा उपक्रम

आजच्या धकाधकीच्या, स्पर्धात्मक आणि तणावपूर्ण जीवनात मानसिक शांतता, एकाग्रता आणि सकारात्मक विचारसरणी जपणे ही काळाची गरज बनली आहे. याच पार्श्वभूमीवर आयोजित करण्यात येणारे ध्यानसाधना व व्यक्तिमत्त्व विकास शिबिर हे केवळ प्रशिक्षण नसून व्यक्तीच्या सर्वांगीण विकासाचा प्रभावी मार्ग ठरते. मन, बुद्धी आणि शरीर यांचा समतोल साधत आत्मविश्वासपूर्ण जीवन जगण्यासाठी अशा शिबिरांची महत्त्वाची भूमिका आहे.

ध्यानसाधनेमुळे मनातील तणाव कमी होतो, विचारांमध्ये स्पष्टता येते आणि निर्णयक्षमता वाढते. नियमित ध्यान करणाऱ्या व्यक्तींमध्ये संयम, सकारात्मकता आणि भावनांवर नियंत्रण ठेवण्याची क्षमता अधिक विकसित होत असल्याचे विविध अभ्यासांतूनही दिसून आले आहे. काही मिनिटांची ध्यानसाधनाही दिवसभरातील कामगिरी अधिक परिणामकारक बनवू शकते.

व्यक्तिमत्त्व विकास हा केवळ बाह्य व्यक्तिमत्त्वापुरता मर्यादित नसून संवादकौशल्य, नेतृत्वगुण, वेळेचे नियोजन, आत्मविश्वास, सामाजिक वर्तन आणि सकारात्मक दृष्टीकोन यांचा समन्वय आहे. अशा शिबिरांमध्ये सहभागी होणाऱ्या युवकांना स्वतःची क्षमता ओळखण्याची आणि ती प्रभावीपणे विकसित करण्याची संधी मिळते.

शिबिरात साधारणपणे प्राणायाम, ध्यानसाधना, योगाभ्यास, प्रेरणादायी व्याख्याने, समूहचर्चा, नेतृत्व विकास, संवादकौशल्य प्रशिक्षण, वेळ व्यवस्थापन आणि व्यक्तिमत्त्व घडविणाऱ्या विविध कृतींचा समावेश असतो. या उपक्रमांमुळे सहभागींची एकाग्रता वाढते, आत्मविश्वास दृढ होतो आणि जीवनाकडे पाहण्याचा सकारात्मक दृष्टिकोन विकसित होतो.

विद्यार्थी, युवक, कर्मचारी, व्यावसायिक तसेच ज्येष्ठ नागरिक अशा सर्व वयोगटांसाठी अशी शिबिरे उपयुक्त ठरतात. परीक्षेची तयारी करणाऱ्या विद्यार्थ्यांसाठी मानसिक स्थैर्य आणि एकाग्रता वाढविण्यास मदत होते, तर नोकरी व व्यवसायातील व्यक्तींना तणाव नियंत्रण आणि कार्यक्षमता सुधारण्याचा लाभ मिळतो.

आजच्या डिजिटल युगात मोबाईल, सोशल मीडियाचा अतिरेकी वापर आणि सततची धावपळ यामुळे मनावर मोठा ताण निर्माण होत आहे. अशा परिस्थितीत काही तास किंवा काही दिवस ध्यानसाधना व व्यक्तिमत्त्व विकासासाठी दिल्यास त्याचा सकारात्मक परिणाम दीर्घकाळ जाणवू शकतो.

समाजात मानसिक आरोग्याबाबत जागरूकता वाढविणे, युवकांना सकारात्मक दिशा देणे आणि सुदृढ समाज घडविण्यासाठी अशा शिबिरांचे आयोजन अधिक व्यापक प्रमाणावर होणे आवश्यक आहे. अंतर्मनातील शक्ती जागृत करून आत्मविश्वासाने जीवन जगण्याची प्रेरणा देणारे ध्यानसाधना व व्यक्तिमत्त्व विकास शिबिर हे प्रत्येकासाठी जीवन समृद्ध करणारे पाऊल ठरू शकते.

# सेवा संकल्पातून लोकाभिमुख प्रशासन महिनाभराचा उपक्रम : प्रशासन जनतेच्या दारी

'सेवा परमो धर्मः' ही केवळ एक उक्ती नाही, तर सामान्य माणसाच्या जीवनात सकारात्मक बदल घडवून आणण्याची भावना आहे. शासनाच्या योजना तयार होतात, निर्णय घेतले जातात; मात्र त्यांचा खरा अर्थ तेव्हा अधोरेखित होतो, जेव्हा त्या योजनांचा लाभ गावातील सामान्य कुटुंबापर्यंत, शेतकऱ्यांपर्यंत, महिलांपर्यंत, विद्यार्थ्यांपर्यंत आणि गरजू व्यक्तींपर्यंत पोहोचतो. प्रशासन १७ सप्टेंबरपासून अशाच एका लोकाभिमुख अभियानाच्या प्रभावी अंमलबजावणीसाठी सज्ज झाले आहे. केंद्र व राज्य शासनाच्या विविध योजनांचा लाभ पात्र लाभार्थ्यांपर्यंत पोहोचविणे, नागरिकांचा सहभाग वाढविणे, त्यांच्या सहभागाचे कौतुक करणे आणि शासन नागरिकांच्या पाठीशी असल्याची भावना दृढ करणे, हा या अभियानाचा प्रमुख उद्देश आहे.

प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांच्या संवैधानिक पदावरील कारकीर्दीला २५ वर्षे पूर्ण होत असल्याच्या निमित्ताने, त्यांच्या कार्यकाळात 'सेवा परमो धर्मः' या भावनेतून सामान्य नागरिकांपर्यंत सेवा पोहोचविण्याच्या प्रयत्नांना अधिक व्यापक स्वरूप देण्यासाठी केंद्र आणि राज्य शासनाकडून विविध सेवा उपक्रम राबविले जात आहेत. याच भावनेतून महाराष्ट्र शासनाने १७ सप्टेंबर २०२६ ते १७ ऑक्टोबर २०२६ या कालावधीत राज्यात 'सेवा संकल्प अभियान' राबविण्याचा निर्णय घेतला आहे.हे अभियान म्हणजे केवळ कार्यक्रमांची मालिका नाही. सरकारी सेवा आणि योजना सामान्य माणसाच्या अधिक जवळ नेण्याचा हा प्रयत्न आहे.

**कार्यालयाच्या फेऱ्या कमी होणार**

गावातील एखाद्या नागरिकाला प्रमाणपत्र हवे असते, शेतकऱ्याला जमिनीची नोंद अद्ययावत करायची असते किंवा एखाद्या कुटुंबाला सरकारी योजनेचा लाभ घ्यायचा असतो. अशा वेळी अनेकदा विविध कार्यालयांमध्ये जावे लागते. सेवा संकल्प अभियानात ही प्रक्रिया शक्य तितकी सोपी करण्यावर भर देण्यात आला आहे.

प्रत्येक तालुक्यात 'सेवा सेतू' शिबिरे आयोजित करून विविध शासकीय योजनांचे लाभ पात्र




नागरिकांना उपलब्ध करून देण्यात येणार आहेत. म्हणजेच अनेक सेवा एकाच ठिकाणी मिळण्याची सुविधा निर्माण होणार आहे.

**शिबिरांच्या माध्यमातून कामांना गती**

या शिबिरांमध्ये फेरफार नोंदींचा निपटारा, स्वामित्व सनद, शेतपाणंद रस्ते, शिधापत्रिका, नॉन-क्रिमिलेयर प्रमाणपत्र, वनहक्क दावे, नळजोडणी, वीज जोडणी, दिव्यांग प्रमाणपत्र, विवाह नोंदणी, आधार, जन्म-मृत्यू प्रमाणपत्र, शिकाऊ वाहनचालक परवाना, महिला बचत गट नोंदणी, ज्येष्ठ नागरिक प्रमाणपत्र तसेच ७/१२ आणि ८-अ नोंदी अद्ययावत करण्यासारख्या सेवा उपलब्ध करून देण्यात येणार आहेत. सोप्या भाषेत सांगायचे तरङ्ज्या सेवेसाठी नागरिकाला वारंवार कार्यालयात जावे लागते, ती सेवा शक्य तितकी त्याच्या जवळ नेण्याचा प्रयत्न या अभियानातून होणार आहे.

**गावात सेवा, गावातच समाधान**

सेवा संकल्प अभियानाचा विशेष भर ग्रामीण भागावरही आहे. प्रत्येक गावात आणि वॉर्डात स्थानिक गरजेनुसार 'सेवा माझे योगदान' उपक्रम राबविण्यात येणार आहेत. गावातील युवक, महिला, ज्येष्ठ नागरिक आणि सामाजिक क्षेत्रातील व्यक्तींना यात सहभागी करून घेतले जाणार आहे.

गाव स्वच्छ ठेवणे, नदीघाट आणि बारवांची स्वच्छता करणे, वृक्षारोपण करणे, रक्तदान करणे, आरोग्य तपासणी शिबिर घेणे, प्लास्टिकमुक्तीची जनजागृती करणे, जलसंधारण करणे, कचऱ्याचे वर्गीकरण करणे, रस्ते सुरक्षेबाबत जागृती करणे अशा अनेक उपक्रमांना या माध्यमातून चालना मिळणार आहे.

**शासनाची सेवा, समाजाचा सहभाग**

याचा अर्थ एकच शासनाची सेवा आणि समाजाचा सहभाग एकत्र आला, तर गावाचा विकास अधिक वेगाने होऊ शकतो.ग्रामीण भागातील नागरिकांसाठी जमीन आणि महसूल विषयक कागदपत्रे अत्यंत महत्त्वाची असतात. फेरफार नोंदी, ७/१२, ८-अ, स्वामित्व सनद, वनहक्क दावे यांसारख्या बाबी अनेकांच्या दैनंदिन जीवनाशी जोडलेल्या आहेत.

वनहक्क दाव्यांच्या बाबतीत नवीन दावे स्वीकारणे, जुन्या दाव्यांमधील दुरुस्ती करणे आणि पात्र दावे निकाली काढण्याची प्रक्रिया अभियानाच्या कालावधीत पूर्ण करण्याच्या सूचना देण्यात आल्या आहेत.म्हणूनच सेवा संकल्प अभियानाचा लाभ गावातील नागरिकांनी आपल्या दैनंदिन गरजांशी जोडून पाहणे महत्त्वाचे आहे.

**अंगणवाडीतही सेवा उत्सव**

लहान मुले आणि त्यांच्या मातांसाठीही या अभियानांतर्गत विशेष उपक्रम राबविण्यात येणार आहे. 'अंगणवाडी उत्सव' अंतर्गत अंगणवाडी केंद्रांवर मुलांसोबत मातांना आमंत्रित करून महिलांना आरोग्य आणि पोषणविषयक योजनांची माहिती देण्यात येणार आहे. मुलांसाठी मनोरंजनाचे कार्यक्रम, फळे व मिठाईचे वाटप आणि अंगणवाडी सेविका, मदतनीस व आशा कार्यकर्त्यांचा सन्मान करण्याची तरतूद आहे. ग्रामीण कुटुंबाच्या आरोग्याचा पाया मजबूत करण्यासाठी आई आणि बालकाचे आरोग्य महत्त्वाचे आहे. त्यामुळे अंगणवाडी उत्सव हा केवळ एक कार्यक्रम न राहता आई, बालक आणि पोषण यांना जोडणारा उपक्रम ठरतो.

**गावातील तरुणांच्या कल्पनांना नवे व्यासपीठ**

आज ग्रामीण भागातील तरुणांकडे अनेक चांगल्या कल्पना आहेत. शेती, पाणी, शिक्षण, आरोग्य, रोजगार, तंत्रज्ञान अशा अनेक क्षेत्रांत ते नवे प्रयोग करू शकतात. योग्य संधी आणि व्यासपीठ मिळाले, तर या कल्पना मोठ्या बदलाचे कारण ठरू शकतात.सेवा संकल्प अभियानात राज्यातील युवा, विद्यार्थी, स्टार्टअप्स, व्यावसायिक, कॉर्पोरेट इनोव्हेटर्स आणि ग्रामीण भागात नवे प्रभावी उपाय विकसित करणाऱ्या व्यक्तींना जोडण्यासाठी 'इनोव्हेशन चॅलेंज' आयोजित करण्यात येणार आहे. शैक्षणिक संस्था, स्टार्टअप नेटवर्क, इन्क्युबेशन सेंटर आणि खासगी कंपन्यांचाही सहभाग घेतला जाणार आहे. निवडलेल्या उत्कृष्ट कल्पनांना तज्ज्ञांसमोर सादरीकरणाची संधी मिळणार आहे.

**विद्यार्थ्यांच्या स्वप्नांना दिशा**

देशाचे भविष्य वर्गखोल्यांमध्ये घडत असते. त्यामुळे विद्यार्थ्यांनाही या अभियानाशी जोडण्यात आले आहे. 'विकसित भारत' आणि 'मुलांच्या स्वप्नातील भारत' या विषयांवर चित्रकला आणि वक्तृत्व स्पर्धा घेण्यात येणार आहेत. विद्यार्थ्यांच्या कल्पना आणि स्वप्नांना व्यासपीठ देण्याचा हा प्रयत्न आहे.आजचा विद्यार्थी उद्याचा नागरिक आहे. त्यामुळे विकसित भारताची संकल्पना विद्यार्थ्यांच्या मनात रुजविण्यासोबतच त्यांच्या कल्पना आणि स्वप्नांना भविष्यातील भारताच्या उभारणीशी जोडण्याचा हा प्रयत्न आहे.

**लाभार्थ्यांच्या घरापर्यंत 'आशीर्वादाचा दिवा'**

शासकीय योजनेचा लाभ मिळालेल्या नागरिकाच्या घरापर्यंत जाऊन 'आशीर्वादाचा दिवा' प्रज्वलित करण्याचा उपक्रमही या अभियानात आहे. विविध योजनांचा प्रत्यक्ष लाभ मिळालेल्या लाभार्थ्यांच्या घरी जाऊन दीप प्रज्वलित करणे, हा या उपक्रमामागील उद्देश आहे.सरकारची योजना कागदावर असते; पण तिचा लाभ जेव्हा एखाद्या कुटुंबाच्या घरात पोहोचतो, तेव्हा त्या योजनेला खरा अर्थ प्राप्त होतो. त्या समाधानाच्या क्षणाला जोडणारा हा उपक्रम आहे.

**बदलाची गोष्ट आता गावागावातून**

एखाद्या शेतकऱ्याला योजनेचा लाभ मिळाल्याने शेतीत बदल झाला, एखाद्या महिलेला बचत गटामुळे आर्थिक आधार मिळाला, एखाद्या विद्यार्थ्याला संधी मिळाली किंवा एखाद्या कुटुंबाचे जीवनमान सुधारले, तर ही केवळ एका व्यक्तीची गोष्ट राहत नाही. ती इतरांसाठीही प्रेरणा बनते.

म्हणूनच 'बदलाची गोष्ट' या उपक्रमातून विविध योजनांमुळे नागरिकांच्या जीवनात झालेला सकारात्मक बदल त्यांच्या स्वतःच्या शब्दांत समाजासमोर आणला जाणार आहे. त्यांच्या अनुभवांचे व्हिडिओ आणि रील्सच्या माध्यमातून संकलन करण्यात येणार आहे.

**सेवा संकल्पाची खरी दिशा**

सेवा संकल्प अभियानातील प्रत्येक उपक्रमामागे वेगवेगळी उद्दिष्टे असली, तरी त्यामागची भावना एकच आहेङ्कसामान्य नागरिकाला सेवा मिळविण्यासाठी अधिक सोपे, सुलभ आणि जवळचे वातावरण निर्माण करणे.१७ सप्टेंबर ते १७ ऑक्टोबर या काळात प्रशासन आणि सामान्य नागरिक यांच्यातील संवाद व लोकसहभाग वाढविणारा ठरणार आहे.

योजनांचा लाभ अधिकाधिक पात्र लाभार्थ्यांना मिळावा, शासन अधिक लोकाभिमुख व्हावे आणि शासनाच्या योजना सामान्य नागरिकांपर्यंत प्रभावीपणे पोहोचाव्यात, हा या उपक्रमाचा प्रमुख उद्देश आहे. 'माहितीअभावी पात्र व्यक्ती वंचित राहता कामा नये', ही या उपक्रमामागील प्रमुख भूमिका आहे. या अभियानाला नागरिकांचा मिळणारा प्रतिसाद त्याच्या यशासाठी महत्त्वाचा ठरणार आहे.

**प्रवीण टाके**
**उपसंचालक विभागीय माहिती कार्यालय, छत्रपती संभाजीनगर**
**९७०२८५८७७७**




# जयंती २ : आरक्षण हे भीक किंवा जातीयवाद नसून सामाजिक न्यायाची भूमिका आहे -प्रमोद शिंदे

**लेखक-दिग्दर्शक शैलेश बळीराम नरवाडे यांचा नुकताच प्रदर्शित झालेला 'जयंती २' हा चित्रपट पाहिला. अगदी अप्रतिम मांडणी असलेल्या या चित्रपटात आरक्षण या मुद्द्यावर दोन्ही बाजू मांडताना अतिशय माहितीपूर्ण चित्रपट बनवला गेला आहे.**

या चित्रपटातील काही जमेच्या बाजू...हा चित्रपट आरक्षणविरोधकांना फक्त उत्तर देणारा नाही, तर आरक्षणविरोधकांचे प्रत्येक मुद्दे खोडून काढण्यात लेखक-दिग्दर्शक यशस्वी झालेले आहेत.

आरक्षणविरोधक स्वतःच्या वैयक्तिक आयुष्यात कशा पद्धतीने लपून-छपून जातीयवाद पाळतात, याची सुद्धा सुंदर मांडणी केलेली आहे. आरक्षणविरोधक संस्कृतीचे नाव घेत, तिच्या नावावर चाललेला छळ आणि अत्याचार याचे कसे समर्थन करतात, हेही यात मांडलेले आहे. प्रत्येक वेळेला आरक्षणविरोधक जो मुद्दा मांडतात की, आरक्षणामुळे भारत मागे पडलेला आहे, याचेही उत्तर देण्यात लेखक-दिग्दर्शक यशस्वी झालेले आहेत. हजारो वर्षे एकाच वर्गाचे असलेले आरक्षण आजही तसेच राहावे, यासाठी कशा पद्धतीने प्रयत्न केले जातात, हेही यात मांडलेले आहे.

महत्त्वाचे म्हणजे, आरक्षणाला विरोध करणारे अनेक लोक अज्ञानामुळे किंवा अपूर्ण माहितीमुळे आरक्षणाला विरोध करतात. त्यांना जर आरक्षणामागचा इतिहास, सामाजिक परिस्थिती आणि त्याची खरी गरज परिपूर्णपणे समजावून सांगितली, तर तेही या गरीब, कष्टकरी आणि वंचित समाजासोबत आरक्षणाच्या बाजूने उभे राहू शकतात, हा विचारही चित्रपटातून अतिशय अप्रतिम पद्धतीने मांडण्यात आला आहे.

आरक्षण समजावताना केवळ पुस्तकी किंवा सैद्धांतिक माहिती न देता, प्रत्यक्ष फिल्डवरील काही प्रॅक्टिकल गोष्टीही अतिशय छान पद्धतीने मांडल्या आहेत. त्यातून आरक्षण का गरजेचे आहे, हे सांगण्यात लेखक-दिग्दर्शक यशस्वी झालेले आहेत. जर आज कोणाला आरक्षण या मुद्द्यावर कुठे चर्चा करायची असेल, त्यासाठी मुद्दे हवे असतील किंवा एखादी ॲक्टिव्हिटी घ्यायची असेल, तर हा चित्रपट त्यांच्यासाठी खूप गरजेचा आणि माहितीपूर्ण आहे. याशिवाय नेता आणि त्याचे वागणे कसे असते, तसेच कार्यकर्त्यांचे जीवन कसे असते, यातील फरकही लेखक-दिग्दर्शकांनी अप्रतिम आणि सुंदर पद्धतीने मांडलेला आहे. आता राहिला शेवटचा आणि महत्त्वाचा भाग म्हणजे अभिनय. लेखन आणि दिग्दर्शन चांगले आहेच. त्यासोबतच पायल जाधव, प्रियदर्शिनी इंदलकर, ऋतुराज वानखेडे, देविका दफ्तरदार, विजय निकम आणि रोहिणी हट्टंगडी यांचा अभिनय अप्रतिम आहे आणि चित्रपटाला अगदी साजेसा आहे. त्यातही रोहिणी हट्टंगडी यांची भूमिका विशेषतः लक्षात राहण्यासारखी आहे.

त्यामुळे माझी सगळ्यांना विनंती आहे माझ्या भावांना, मित्रांना, मैत्रिणींना, सगळ्यांनी हा अभ्यासपूर्ण चित्रपट पाहावा. तसेच लेखक-दिग्दर्शकांचे हे काम नक्की पाहावे आणि जास्तीत जास्त लोकांपर्यंत माझा हा संदेश पोहोचवावा, ही तुम्हा सगळ्यांना मनापासून विनंती आहे. 'जयंती २' नक्की पाहा आणि या महत्त्वाच्या विषयावर विचार करा!


**प्रमोद शिंदे**
**९९६७०१३३३६**

वरुड दर्पण हे पत्र संपादक, प्रकाशक, मालक चंद्रकांत भाऊरावजी भड यांनी माऊली मुद्राटेक, मुद्रक - चंद्रकांत भा.भड, जिजाऊ नगर, बस स्टॅन्ड रोड, वरुड जि.अमरावती येथे छापून वरुड दर्पण कार्यालय, जिजाऊ नगर, बसस्टॅन्ड रोड, वरुड, ता.वरुड, जि.अमरावती येथुन प्रकाशित केले. (सर्व वाद वरुड न्यायालयाअंतर्गत सोडविले जातील.) मोबा.९४२२१५७७१२, ७७४५०६७७१२

## त्रिरत्न बौद्ध महासंघ वरूड-मोर्शीच्या वतीने जरुडात

# ६ ते ११ नोव्हेंबर दरम्यान व्यक्तिमत्त्व विकास व ध्यानसाधना निवासी शिबिर

(प्रतिनीधी वरूड दर्पण)




**वरूड** – त्रिरत्न बौद्ध महासंघ वरूड–मोर्शीच्या वतीने बौध्द धम्म व्यक्तिमत्त्व विकास व ध्यानसाधना निवासी शिबिराचे आयोजन करण्यात आले आहे.

आजच्या जीवनासाठी बौद्ध जीवन मार्ग या शिबिराचा विषय असून धम्मचारी नागरत्न रायपूर (छत्तीसगढ) हे या शिबिराचे नेतृत्व करणार आहेत. ६ ते ११नोव्हेंबर दरम्यान हे शिबिर जरुड येथील राऊत सेलिब्रेशन हॉल येथे घेण्यात येणार आहे. बौद्ध धम्माची स्पष्टता आणि आपल्या रोजच्या जीवनात त्याचे आचरण, व्यक्तिमत्त्वाचा सर्वांगीण विकास करणे, मनाची एकाग्रता वाढवणे, आत्मविश्वास निर्माण करणे तसेच धम्ममूल्यांचा दैनंदिन जीवनात उपयोग करुन जीवन सुखी व आनंदी करणे हा या शिबिराचा उद्देश आहे. या शिबिरामध्ये ध्यानसाधना, संपर्क, सराव, धम्मप्रवचन, गटचर्चा यांसारख्या विविध उपक्रमांचे आयोजन करण्यात येत आहे.

भगवान बुद्धांनी सांगितलेल्या पंचशीलातील हिंसा, चोरी, व्यभिचार, खोटे बोलणे, मद्य प्राशन, गुटखा, तंबाखु, बिडी सिगारेट इत्यादी अकुशल (वाईट ) सवई मानवाची कशी हानी करतात म्हणुन स्वतःमध्ये चांगल्या बाबीचा विकास करणे. शील, सदाचार, संयम आणि नैतिक जीवन यांचा व्यक्तिमत्त्व विकासाशी असलेला संबंध, श्रद्धेचा विकास करण्यासाठी पूजा, ध्यान, चिंतन, संवाद, सकारात्मक विचार, स्वजागृती, मैत्रीभाव आणि सामाजिक बांधिलकी विकसित करण्याचा प्रयत्न या शिबिरातून केला जातो. धम्माच्या माध्यमातून व्यक्तीचा अंतर्गत विकास घडवून आणत सजग, नैतिक आणि जबाबदार जीवन जगण्याची प्रेरणा देणे हे या शिबिराचे प्रमुख वैशिष्ट्य आहे. या कार्यक्रमाच्या यशस्वितेसाठी मुक्त हस्ते दान करण्याचे आवाहन आयोजकांनी केले असून अधिक माहिती व नोंदणी करीता धम्मचारी बोधीनंदन ९९७५०९४५२६, धम्मचारी तेजोमुनी ८४२१५२१७५२, धम्मचारी कुशलबोधी–९०९६३१२७०३, धम्मचारी तेजोदिप्त ९८२३०९१४३४, धम्मचारी प्रसन्नदर्शी ९६७३२२९३२१, धम्मचारी कुशलसत्व ८३२९६०५०१९, धम्मचारीणी अचलसिरी ९६०७६९९८३०, धम्मचारीणी श्रद्धाश्री ९८९०६९२७३८, धम्मचारीणी मैत्रीतारा ९०१११७०३२६, धम्मचारी श्रद्धादित्य ९४२०४०८९८७ यांचेशी संपर्क साधावा, असे आवाहन एका प्रसिध्दीपत्रकाव्दारे केले आहे.

# पाणी संकटासाठी टंचाई कृती आराखडा : गावांची यादी तयार करण्याची सूचना

(प्रतिनीधी वरूड दर्पण)

**मुंबई** – सप्टेंबर महिना निम्मा उलटून गेल्यानंतरही राज्याच्या अनेक भागात पुरेसा पाऊस झालेला नाही. त्यामुळे राज्यात पिण्याच्या पाण्याचे तीव्र दुर्भिक्ष जाणवण्याची शक्यता लक्षात घेऊन राज्य सरकारने संभाव्य पाणीबाणीचा मुकाबला करण्यासाठी टंचाई कृती आराखडा तयार करण्यासाठी वेळापत्रक जाहीर केले आहे. त्यानुसार ऑक्टोबर ते जून २०२७ अशा नऊ महिन्यांसाठी १५ नोव्हेंबर, २० डिसेंबर २०२६ आणि २० जानेवारी २०२७ ता तारखांना वेळापत्रक सादर करण्याची सूचना जिल्हाधिकाऱ्यांना देण्यात आली आहे. मंगळवारी पार पडलेल्या राज्य मंत्रिमंडळ बैठकीत राज्यातील पीक पाण्याच्या परिस्थितीचा आढावा घेण्यात आला. त्यावेळी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी पावसाने ओढ दिल्याने राज्य सरकारने टंचाई निवारणाच्या उपाययोजना सुरू केल्याची माहिती दिली होती. त्यानुसार पाणी पुरवठा विभागाने बुधवारी पाणी टंचाई कृती आरखडा तयार करण्याबाबत शासन परिपत्रक जारी केले. त्यानुसार येत्या उन्हाळ्यात पाणी टंचाईची शक्यता असलेल्या गाव, वाड्यांची यादी तयार करून तहसीलदार आणि गटविकास अधिकाऱ्यांनी त्याचा संयुक्त अहवाल ऑक्टोबर महिन्यात जिल्हाधिकाऱ्यांना सादर करण्याची सूचना देण्यात आली आहे.

## सुरक्षारक्षक नसल्याचा फायदा घेत चोरट्यांनी थेट अढच मशीनच पळवलं

(प्रतिनीधी वरूड दर्पण)

**सांगली** – एटीएम फोडून पैसे चोरण्याच्या घटना आपण अनेकदा ऐकतो, मात्र सांगलीत चोरट्यांनी चक्क संपूर्ण एटीएम मशीनच पळवून नेल्याचा धक्कादायक प्रकार समोर आला आहे. सांगली वाडीतील डॉ.पतंगराव कदम कॉलेजसमोरील एचडीएफसी बँकेच्या एटीएम केंद्रातून चोरट्यांनी मशीन लांबवले. विशेष म्हणजे, या मशीनमध्ये तब्बल १० लाख ३४ हजार ८०० रुपयांची रोकड होती. एनसीआर कार्पोरेशन इंडिया प्रा. लि.चे स्थानिक प्रतिनिधी विकास आमनगी यांनी सांगली शहर पोलिस ठाण्यात तक्रार दाखल केली असून, पोलिसांकडून अज्ञात चोरट्यांचा शोध सुरू आहे.

## न्यू ऑरेंज सिटी कॉन्व्हेंटमध्ये

# विद्युत सुरक्षा, हरित ऊर्जा व ऊर्जा बचत विषयावर प्रबोधन

(प्रतिनीधी वरूड दर्पण)



**वरूड** – स्थानिक न्यू आँरेंज सिटी कॉन्व्हेंट येथे गणेशोत्सव व अभियंता दिनानिमित्त विद्युत सुरक्षा, हरित ऊर्जा व ऊर्जा बचत या विषयावर विशेष प्रबोधन व जनजागृती सत्राचे यशस्वी आयोजन करण्यात आले होते.

या सत्राला प्रामुख्याने असिस्टंट इंजिनियर गौरव चरडे, जुनियर इंजिनियर पराग निखार, प्राचार्या माधुरी भोंडे, समन्वयक श्वेता गणोरकर, विभाग प्रमुख किशोर देशमुख, पराग भोंडे उपस्थित होते. सर्वप्रथम सरस्वतीच्या प्रतिमेचे पूजन करून या सत्राची सुरुवात झाली .

आजच्या आधुनिक युगात अन्न ,वस्त्र आणि निवारा इतकीच वीज ही मानवी जीवनाची एक अनिवार्य गरज बनली आहे. वीज आपल्या दैनंदिन जीवनाला प्रकाशमय आणि गतिमान करते परंतु पुरेशी माहिती आणि सुरक्षेच्या नियमांचा अभाव असल्यास हीच ऊर्जा प्राण घातक ठरु शकते. पराग निखार यांनी वाढते प्रदूषण आणि विजेची वाढती मागणी लक्षात घेता भविष्यातील संकटांवर मात करण्यासाठी नागरिक आणि विद्यार्थ्यांनी सौर ऊर्जेसारख्या अपारंपारिक साधनांचा वापर वाढवणे कसा आवश्यक आहे, याबद्दल विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले तसेच गौरव चरडे यांनी विजेची निर्मिती कशी होते? ऊर्जा बचत का करावी आणि विजेचा अपव्यय कसा टाळावा? याबाबत विद्यार्थ्यांना 'ऊर्जा साक्षरता' करण्याचा महावितरणाचा उपक्रमाद्वारे समजावून सांगितले.




कार्यक्रमाचे संचालन व प्रदर्शन पराग भोंडे यांनी मानले. या कार्यक्रमासाठी संचालक मंडळाचे अध्यक्ष डॉ.राम गोधने, माजी अध्यक्ष गोपाल वानखडे, उपाध्यक्ष सुधाकर ठाकरे, सचिव अनिल गुल्हाने, सहसचिव श्याम खंडेलवाल, कोषाध्यक्ष वेदांत राजोरिया, सदस्य विनय यावलकर या सर्व मान्यवरांचे मोलाचे सहकार्य लाभले.

# सर्व विभागांनी सक्रिय सहभागी होऊन 'सेवा संकल्प अभियान' अमरावती विभागात यशस्वी करावे : विभागीय आयुक्त नयना गुंडे

(प्रतिनीधी वरूड दर्पण)




**अमरावती** – सामान्य नागरिकांपर्यंत सेवा पोहचविण्याच्या उद्देशाने १७ सप्टेंबर ते १७ ऑक्टोबर २०२६ या कालावधीत राज्यात 'सेवा संकल्प अभियान' राबविण्यात येत आहे. त्या अंतर्गत अमरावती विभागातील जिल्हाधिकारी, मुख्य कार्यकारी अधिकारी, महानगर पालिकांचे आयुक्त यांच्या बरोबरच सर्व विभागांच्या विभागीय, जिल्हा व तालुका स्तरीय अधिकारी कर्मचाऱ्यांनी सक्रिय सहभागी होऊन अमरावती विभागात 'सेवा संकल्प अभियान' यशस्वी करावे असे आवाहन अमरावती विभागाच्या विभागीय आयुक्त नयना गुंडे यांनी केले.

शासन निर्णयानुसार 'सेवा संकल्प अभियानाच्या' अंमलबजावणीसाठी अमरावती विभाग स्तरावर विभागीय आयुक्त यांच्या अध्यक्षतेखाली अंमलबजावणी व सनियंत्रण समिती गठित करण्यात आली आहे. या समितीच्या बैठकीत विभागीय आयुक्त गुंडे बोलत होत्या समितीचे सदस्य विभागातील जिल्ह्यांचे जिल्हाधिकारी आशिष येरेकर, वर्षा मिना, प्रविण देवरे, विकास मिना, योगेश कुंभेजकर, जिल्हा परिषदांचे मुख्य कार्यकारी अधिकारी सत्यम गांधी, नयन नावंदर, गुलाबराव खरात, विशाल खत्री, अर्पित चव्हाण, महानगरपालिकांचे आयुक्त डॉ.मंगेश गोंदावले, सुनिल लहाने, या बैठकीस दुरदृष्य प्रणालीद्वारे उपस्थित होते. तसेच समितीचे सदस्य सचिव माहिती उपसंचालक अनिल आलुरकर, महसुलचे अप्पर आयुक्त अनिल खंडागळे, विकास योजनेच्या अप्पर आयुक्त शालिनी कडू, नगरपालिका प्रशासनाचे सह आयुक्त नितिन कापडनिस, विकास योजना सहायक आयुक्त राजु फडके, उपायुक्त प्रविण मानकर आदि उपस्थित होते. सेवा संकल्प अभियानाअंतर्गत विविध विभागांनी विविध उपक्रम राबविण्याबाबत सविस्तर मार्गदर्शन करुन विभागीय आयुक्त नयना गुंडे म्हणाल्या की, या अभियानात महसुल, ग्रामविकास, शिक्षण, नगरविकास, पाणीपुरवठा, आरोग्य, वन, कौशल्य, रोजगार, उद्योजकता आणि नाविन्यता, माहिती व जनसंपर्क, महिला व बालविकास, सामाजिक न्याय, उच्च व तंत्रशिक्षण, उद्योग, आदिवासी विकास, दिव्यांग कल्याण इत्यादी विभागांनी आपापल्या योजनांची उपक्रमांची अंमलबजावणी करुन लाभार्थ्यांना अभियान कालावधीत प्राधान्याने लाभ घ्यायचा आहे.

## तालुकास्तरीय बॅडमिंटन आंतरशालेय स्पर्धेत

# एनटीआर हायस्कूलचे दैदिप्यमान यश

(प्रतिनीधी वरूड दर्पण)




**वरूड** – तालुकास्तरीय बॅडमिंटन आंतरशालेय स्पर्धेत नवयुवक शिक्षण संस्थेद्वारा संचालित एनटीआर हायस्कूल व शंकरराव बंदे कला व विज्ञान कनिष्ठ महाविद्यालयच्या विद्यार्थ्यांनी उत्कृष्ट क्रीडा कौशल्याचे प्रदर्शन करत प्रथम क्रमांक पटकावुन दैदिप्यमान यश संपादन केले.

या स्पर्धेत एनटीआर हायस्कूलच्या सुजल मानकर, भूषण राऊत, प्रेम देऊळकर, प्रियांशु पाटणे व पियुष खंडार या विद्यार्थ्यांनी उत्स्फूर्त सहभाग नोंदवत उत्कृष्ट खेळाचे प्रदर्शन केले. विद्यार्थ्यांच्या मेहनत, सराव, जिद्द आणि सांघिक प्रयत्नांच्या जोरावर हे उल्लेखनीय यश संपादन झाले. विद्यार्थ्यांच्या या यशाबद्दल मुख्याध्यापक योगेश बरडिया, पर्यवेक्षक शशांक पाचघरे, संपूर्ण शिक्षक, शिक्षकेत्तर कर्मचारी व विद्यार्थ्यांनी विजयी विद्यार्थ्यांचे अभिनंदन केले आहे. विद्यार्थ्यांच्या या यशामुळे शाळेच्या क्रीडा क्षेत्रातील लौकिकात आणखी भर पडली आहे. नवयुवक शिक्षण संस्थेच्या पदाधिकाऱ्यांनीही यशस्वी विद्यार्थ्यांचे कौतुक करून त्यांच्या पुढील क्रीडा वाटचालीसाठी मनःपूर्वक शुभेच्छा दिल्या.

## चांदस जिल्हा परिषद पूर्व माध्यमिक शाळा येथे

# तान्हा पोळा मोठ्या उत्साहात साजरा



(प्रतिनीधी वरूड दर्पण)

**चांदस वाठोडा** – जिल्हा परिषद पूर्व माध्यमिक शाळा चांदस येथील उपक्रमशील शिक्षिका योगिता वाडबुदे यांच्या संकल्पनेतून १२ सप्टेंबरला शाळेत तान्हा पोळा मोठ्या उत्साहात साजरा करण्यात आला. यावेळी बालगोपालांनी आपले नंदीबैल आकर्षक सजावट व सुंदर बैल जोडी यांना योगिता वाडबुदे यांचे वतीने प्रथम बक्षिस मृदुला कनाटे, दुसरे बक्षिस करुनेश डायरे, तिसरे अनुष्का सुरजुसे आणि चौथे त्रिशा ब्राम्हणे व गितेश डायरे यांना देण्यात आले. त्यानंतर शाळेतील सर्व विद्यार्थ्यांना सर्व शिक्षकांनी खाऊ म्हणुन बिस्किटे व पोळी देण्यात आली. चांदसचे उपसरपंच नितीन पानसे यांच्या तर्फे शाळेतील सर्व विद्यार्थ्यांना पाणी बॉटल वाटप करण्यात आले. चांदस येथील रहिवासी संजय नांदणे यांच्या तर्फे विद्यार्थ्यांना शैक्षणिक चार्टचे वाटप केले व सर्व विद्यार्थ्यांना बालगोपालांना तान्हा पोळाच्या शुभेच्छा देण्यात आल्या.

# युवकाची विहीरीत उडी घेवुन आत्महत्या

## मलकापुर शेतशिवारातील घटना

(प्रतिनीधी वरूड दर्पण)



**शेंदुरजनाघाट** – येथील मलकापुर शेतशिवारातील सरला जयस्वाल यांचे शेतात राहात असलेल्या २२ वर्षीय युवकाने विहीरीत उडी घेवुन आत्महत्या केल्याची घटना नुकतीच उघडकीस आली.

मृतक गोलु सुकन युवनाते (२२) हा नेहमी दारु पित होता व गरम स्वभावाचा होता. त्याला थोड्या थोड्या कारणावरुन भयंकर राग येत होता व तो रागाच्या भरात घरुन निघुन जात होता व राग शांत झाला की घरी परत येत होता. १० सप्टेंबर रोजी पोळा सण असल्यामुळे मृत गोलुची बहिण रजना वंसता उईके (३०) राखी बाधण्याकरीता घरी आली होती.

रात्री जेवण केल्यानंतर गोलु याने वडिलांना फोन मागीतला, तो दारु पिला असल्यामुळे त्यांनी फोन दिला नाही. त्यानंतर घरातील सगळे झापी गेले.

सकाळी उठल्यानंतर गोलु घरात डिसला नाही, त्यामुळे त्याचा गावात व नातेवाईकात शोध घेतला परंतु मिळुन आला नाही. दोन दिवस होवुन सुध्दा गोलु घरी परत न आल्यामुळे कुटूंबियांनी त्याचा सर्वत्र शोध घेतला. १३ सप्टेंबर रोजी सकाळी ११ वाजता दरम्यान घरी पाणी नसल्यामुळे वडिल शेतातील विहीरीवर पाणी घेण्याकरीता गेले असता त्याच शेतातील विहीरीत गोलु याचा मृतदेह आढळुन आला.

कपडयावरुन वडिलांनी त्याला ओळखले, रागाच्या भरात व दारुच्या नशेत त्याने आत्महत्या केली असावी, असा संशय वडिलांनी व्यक्त केला असुन या प्रकरणी पोलिसांनी आकस्मिक मृत्यूची नोंद केली आहे.

# पुढच्या वर्षी बीडवरुन थेट पुणे, अजित दादांनी शब्द पाळला

## रेल्वेला हिरवी झेंडी दाखवताच सुनेत्रा पवारांना आठवण

(प्रतिनीधी वरुड दर्पण)



**बीड** – मराठवाड्याशी थेट पुण्याला जोडणाऱ्या बीड-पुणे रेल्वेचा आज राज्याच्या उपमुख्यमंत्री तथा बीडच्या पालकमंत्री सुनेत्रा पवार यांच्या हस्ते शुभारंभ करण्यात आला. यावेळी मान्यवरांकडून रेल्वेला हिरवा झेंडा दाखवण्यात आलाय. त्यानंतर, बीडवरुन ही रेल्वे पुण्याच्या दिशेने मार्गस्थ झाली. आज मराठवाडा मुक्ती संग्राम दिनाच्या पार्श्वभूमीवर बीडमधून पहिल्यांदाच पुण्यासाठी रेल्वे धावली. यापूर्वी, बीडमधून अहिल्यानगरसाठी रेल्वे धावल्याने बीडकरांचे रेल्वेचे स्वप्न सत्यात उतरले आहेत.

अजित दादांनी बीडकरांना दिलेला शब्द पाळण्याचं भाग्य मला मिळालं, गेल्या वर्षी दादांनी एक आठवण करून दिली होती, जेव्हा ते पहिल्यांदा लोकसभेत खासदार म्हणून गेले तेव्हा बीडच्या रेल्वेचा प्रस्ताव मंजूर झाला होता. बीडचा विकास आणि बीडची कनेक्टिव्हिटी हाच आपला एकमेव ध्यास आहे. खासदार बजरंग सोनवणेंनी म्हटल्याप्रमाणे आपण बीड ते पनवेल असा थेट प्रवास करणार आहोत. बीडची पालकमंत्री म्हणून मी तुम्हाला शब्द देते, मी देखील अधिकाऱ्यांकडून काम करून घेणार, असे आश्वासन सुनेत्रा पवार यांनी दिले.

अजित दादांचे अपूर्ण स्वप्न पूर्ण करण्यासाठी मी पूर्ण शक्तीने प्रयत्न करेन. बीडकरांचा प्रवास सुखकर व्हावा यासाठी प्रार्थना करते. जाताना एवढेच सांगते, सोनवणे यांनी सांगितलेल्या ज्या ज्या गोष्टी आहेत त्या मी मुख्यमंत्र्याच्या कानावर घालते. आपण सर्वजण मिळून बीड आणि मराठवाड्याला वेगळ्या वळणावर नेण्याचा प्रयत्न करू, असे म्हणत सुनेत्रा पवार यांनी मराठवाड्याच्या विकासावर भाष्य केलं.

# आज आमचे आजोबा असते तर...: प्रबोधनकार ठाकरेंच्या जयंतीनिमित्त राज ठाकरेंची खास पोस्ट; अंधश्रध्दांवर बोट ठेवत काय काय म्हणाले?

(प्रतिनिधी वरुड दर्पण)



**मुंबई** – महाराष्ट्र नवनिर्माण सेनेचे सर्वेसर्वा आणि अध्यक्ष राज ठाकरे यांनी आज (१७ सप्टेंबर २०२६) आपले आजोबा प्रबोधनकार ठाकरे अर्थात केशव सीताराम ठाकरे यांना त्यांच्या जयंतीनिमित्त आदरांजली वाहिली.

यावेळी त्यांनी सोशल मीडियावर एक खास पोस्ट करत आजोबांच्या आठवणींना उजाळा दिला. धर्माच्या नावाखाली कुठल्याही अंधश्रध्दांना श्रद्धा म्हणायचं आणि त्यावर कोणी तार्किक प्रश्न विचारला की त्याला लगेचच हिंदू विरोधी ठरवायचं अशा काळात आमच्या आजोबांची आठवण जास्तच प्रकर्षाने येत असल्याचे ते या फेसबुक पोस्टमध्ये म्हणाले आहे. आमचे आजोबा प्रबोधनकार ठाकरे यांची आज जयंती. आज समाज अती उत्सवप्रिय आणि गोंगाटप्रिय झालेला असताना आणि धर्माच्या नावाखाली कुठल्याही अंधश्रध्दांना श्रद्धा म्हणायचं आणि त्यावर कोणी तार्किक प्रश्न विचारला की त्याला लगेचच हिंदू विरोधी ठरवायचं अशा काळात आमच्या आजोबांची आठवण जास्तच प्रकर्षाने येते. राजकारण्यांनी खरं तर समाज हा कुप्रथांमध्ये अडकत असेल आणि वाहवत जात असेल तर समाजाला थांबवायला हवं.

# ज्येष्ठ गौरींचे आगमन : गणराय-गौराईच्या अनोख्या संगमाने घराघरांत भक्तिभावाचा उत्सव

## गणेशोत्सवात आज गौराईचे स्वागत | सोनपावलांनी सुख-समृद्धीचे आगमन झाल्याची भाविकांची श्रद्धा

(प्रतिनीधी वरुड दर्पण)

**वरुड** – गणेशोत्सवाच्या मंगलमय वातावरणात आज ज्येष्ठा गौरींचे आगमन झाल्याने महाराष्ट्रभर घराघरांत भक्ती, परंपरा आणि उत्साहाचा अनोखा संगम अनुभवायला मिळाला. गणरायाच्या सान्निध्यात गौराईचे विधिवत आवाहन करून त्यांचे औक्षण, रांगोळी, फुलांची आरास आणि पारंपरिक स्वागत करण्यात आले. यंदा गुरुवारी आलेल्या गौरी आवाहनामुळे धार्मिक वातावरणाला विशेष रंग चढला असून, सायंकाळी सुमारे ७.५२ वाजेपर्यंत आवाहनासाठी शुभ मुहूर्त मानला गेला.

गणपती बाप्पाच्या आगमनानंतर काही दिवसांनी माहेरवाशीण म्हणून गौराई घरी येते, अशी महाराष्ट्रातील प्राचीन परंपरा आहे. देवी पार्वतीचे रूप मानल्या जाणाऱ्या ज्येष्ठा आणि कनिष्ठा गौरींचे स्वागत करताना महिलांनी 'गौराई आली सोनपावलांनी आली' असा मंगलगजर करत घरात कुंकवाची पावले उमटवली. या परंपरेत श्रद्धा आणि कुटुंबातील ऐक्याचे दर्शन घडते.




आज सकाळपासूनच घरांची स्वच्छता, फुलांची सजावट, तोरणे, आकर्षक रांगोळ्या आणि दिव्यांच्या प्रकाशात गौराईच्या स्वागताची तयारी करण्यात आली. अनेक ठिकाणी गौराईच्या मुखवट्यांची पारंपरिक आरास करून त्यांना साडी, दागिने आणि फुलांच्या हारांनी सजविण्यात आले. ग्रामीण भागातही महिलांनी पारंपरिक वेशभूषेत एकत्र येऊन गौराईचे औक्षण केले, तर शहरांमध्येही कुटुंबीयांनी मोठ्या उत्साहात हा सोहळा साजरा केला.

गणराय आणि गौराई यांचा संगम हा केवळ धार्मिक विधी नसून कुटुंबातील आनंद, समृद्धी आणि सौख्याचे प्रतीक मानला जातो. त्यामुळे गणेशोत्सवातील हा दिवस विशेष महत्त्वाचा मानला जातो. भाविकांच्या मते, गणपती विघ्नहर्ता म्हणून घरातील संकटे दूर करतात, तर गौराई सुख, संपन्नता आणि सौभाग्याचा आशीर्वाद देते. त्यामुळे या दोन दैवी स्वरूपांचे एकत्र दर्शन ही भक्तांसाठी मोठी पर्वणी ठरते. गौरी उत्सव तीन दिवसांचा असतो. आज आवाहन, उद्या विधिवत गौरी पूजन आणि त्यानंतर विसर्जन असा पारंपरिक क्रम पाळला जातो. पूजनाच्या दिवशी पुरणपोळी, पंचपक्वान्न, दूध-साखर, अळूवडी, विविध भाज्या आणि इतर पारंपरिक पदार्थांचा नैवेद्य अर्पण करण्याची प्रथा आहे.

वरुड शहरासह तालुक्यातील विविध भागांमध्ये आज महिलांनी हळदी-कुंकूचे कार्यक्रम आयोजित केले, तर अनेक सार्वजनिक गणेश मंडळांनीही गौराईच्या आगमनानिमित्त विशेष सजावट केली. घराघरांत आरतीचे सूर, फुलांचा सुगंध आणि मंगलमय वातावरणामुळे गणेशोत्सवाचा आनंद द्विगुणित झाल्याचे चित्र पाहायला मिळाले. श्रद्धा, संस्कृती आणि कुटुंबीयांच्या एकोप्याला अधोरेखित करणारा गणराय-गौराईचा हा अनोखा संगम यंदाही महाराष्ट्राच्या सांस्कृतिक परंपरेचे सुंदर दर्शन घडवून गेला.

# पृथ्वीभोवतीचे नैसर्गिक संरक्षक कवच २०६६ पर्यंत पूर्णपणे पूर्ववत? जागतिक ओझोन दिनानिमित्त जागतिक हवामान संघटनेच्या अहवाल प्रसिद्ध

(प्रतिनीधी वरुड दर्पण)




**पुणे** – जागतिक स्तरावर क्लोरोफ्लुरोकार्बन (सीएफसी) आणि ओझोन थराला हानी पोहोचविणाऱ्या अन्य घातक वायूंच्या उत्सर्जनावर लादण्यात आलेल्या कठोर निर्बंधांचे सकारात्मक परिणाम आता स्पष्टपणे दिसून येत आहेत. अंटार्क्टिका खंडावरील ओझोन थराचे छिद्र गेल्या काही दशकांत लक्षणीयरीत्या लहान झाले असून, येत्या २०६६ पर्यंत पृथ्वीभोवतीचे हे नैसर्गिक संरक्षक कवच मोठ्या प्रमाणात पूर्ववत होण्याची शक्यता व्यक्त करण्यात आली आहे. जागतिक ओझोन दिनानिमित्त प्रसिद्ध करण्यात आलेल्या जागतिक हवामान संघटनेच्या अहवालात मॉन्ट्रियल प्रोटोकॉलच्या यशावर प्रकाश टाकण्यात आला आहे. सन २००० पासून ओझोन थराच्या पुनर्प्राप्तीची प्रक्रिया सुरू असून, हा जागतिक पर्यावरण संवर्धनातील महत्त्वाचा टप्पा असल्याचे संघटनेने नमूद केले आहे. हवामान संघटनेच्या ओझोन बुलेटिननुसार, २०२४ आणि २०२५ या सलग दोन वर्षांत अंटार्क्टिकावरील ओझोन छिद्राचा विस्तार आणि खोली १९९० ते २०१० या कालावधीतील सरासरीपेक्षा लक्षणीयरीत्या कमी नोंदविण्यात आली. २०२४ मधील ओझोन छिद्र हे १९९२ नंतरचे सातवे सर्वांत लहान छिद्र ठरले, तर २०२५ मधील छिद्र चौथे किंवा पाचवे सर्वांत लहान असल्याचे नमूद करण्यात आले आहे. २०२४ मध्ये या छिद्राचे सरासरी क्षेत्रफळ सुमारे २० दशलक्ष चौरस किलोमीटर होते. २८ सप्टेंबर रोजी ते कमाल २२.४ दशलक्ष चौरस किलोमीटरपर्यंत पोहोचले होते.

# सेवा संकल्प अभियानातून वंचित घटकांना शासकीय योजनांचा लाभ द्यावा : महसूलमंत्री बावनकुळे

(प्रतिनीधी वरुड दर्पण)




**मुंबई** – प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांच्या वाढदिवसानिमित्त १७ सप्टेंबर ते १७ ऑक्टोबर या कालावधीत राबविण्यात येणाऱ्या 'सेवा संकल्प अभियानातून' विमुक्त जाती, भटक्या जमाती, स्थलांतरित समाज तसेच विविध वंचित घटकांपर्यंत शासकीय योजनांचा लाभ पोहोचवावा. संबंधित गटविकास अधिकारी आणि तहसीलदार यांच्याशी समन्वय साधून जिल्हास्तरीय यंत्रणेने अशा लाभार्थ्यांचा शोध घ्यावा व त्यांना आवश्यक शासकीय दाखले उपलब्ध करून द्यावेत, अशा सूचना महसूल मंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांनी दिल्या.

सेवा संकल्प अभियानाच्या अंमलबजावणीसंदर्भात मंत्रालयात आयोजित बैठकीत महसूल मंत्री बावनकुळे बोलत होते. मुख्य सचिव राजेश अग्रवाल यांच्यासह विविध विभागांचे वरिष्ठ अधिकारी बैठकीस उपस्थित होते.

महसूल मंत्री बावनकुळे म्हणाले की, प्रधानमंत्री सूर्यघर मोफत वीज योजनेअंतर्गत अनुसूचित जाती व अनुसूचित जमाती प्रवर्गातील, १०० युनिटपर्यंत वीज वापर असलेल्या कुटुंबांना लाभ देण्यासाठी सामाजिक न्याय तसेच आदिवासी विकास विभागाने पुढाकार घ्यावा. केंद्र शासनाच्या निधीव्यतिरिक्त आवश्यक असलेली तफावत जिल्हा नियोजन समिती अथवा सामाजिक न्याय आणि आदिवासी विकास विभागाच्या निधीतून पूर्ण करण्याची कार्यवाही करावी. पात्र कुटुंबांना ही योजना संपूर्ण अनुदानावर उपलब्ध करून देण्याच्या दृष्टीने नियोजन करावे.

सार्वजनिक वितरण व्यवस्थेअंतर्गत ज्या शिधापत्रिकाधारकांना धान्याची आवश्यकता नाही, त्यांना विश्वासात घेऊन त्यांच्या संमतीने व प्रचलित नियमांनुसार हे धान्य गरजू नागरिकांपर्यंत पोहोचविण्याची कार्यवाही करावी.

या उपक्रमाचाही सेवा संकल्प अभियानात समावेश करावा, असे निर्देशही त्यांनी दिले.

वनहक्क दाव्यांवरील कार्यवाहीला गती देण्यासाठी कालबद्ध कार्यक्रम राबवावा. त्यानुसार १७, १८ आणि १९ सप्टेंबर रोजी वनहक्क ग्राम समित्यांच्या बैठका घेऊन दाव्यांची छाननी व मंजुरीची कार्यवाही करावी.

त्यानंतर ३० सप्टेंबर तसेच १ आणि २ ऑक्टोबर रोजी ग्रामसभा घेऊन दावे मंजूर करावेत. उपविभागीयस्तरीय समितीच्या बैठका ८ आणि ९ ऑक्टोबर रोजी, तर जिल्हास्तरीय समितीच्या बैठका १६ आणि १७ ऑक्टोबर रोजी घेण्यात याव्यात. आदिवासी विकास आणि महसूल विभागाने यासाठी एकत्रितपणे काम करावे. ज्या आदिवासी शेतकऱ्यांना वनहक्क पट्टे मिळाले आहेत, त्यांना सातबारा उतारे देण्याची कार्यवाहीही तातडीने करावी, असे बावनकुळे यांनी सांगितले.

अभियानांतर्गत पांदण रस्त्यांना क्रमांक देऊन त्यांचे ग्रीड तयार करावे. नवीन पांदण रस्त्यांचा शोध घेऊन पात्र कामांना प्रशासकीय मान्यता द्यावी आणि कामे सुरू करावीत. यामुळे पांदण रस्त्यांची अधिकृत नोंद तयार होऊन प्रत्येक रस्त्याला स्वतंत्र संकेतांक मिळेल. भविष्यात या रस्त्यांच्या विकासाचे नियोजन करणेही सुलभ होईल, असे त्यांनी नमूद केले.

१ जानेवारी २०११ पूर्वी रहिवास क्षेत्रात अथवा शासकीय जागेवर अतिक्रमण करून वास्तव्यास असलेल्या पात्र नागरिकांना प्रचलित शासन निर्णय आणि निकषांनुसार पट्टे देण्याचा कार्यक्रमही अभियानांतर्गत राबवावा. अभियानाची माहिती अधिकाधिक नागरिकांपर्यंत पोहोचविण्यासाठी स्थानिक समाजमाध्यम प्रभावकांच्या माध्यमातून व्यापक जनजागृती करावी, अशा सूचनाही महसूल मंत्री बावनकुळे यांनी दिल्या.

मुख्य सचिव राजेश अग्रवाल यांनी सेवा संकल्प अभियानाची प्रभावी अंमलबजावणी करण्यासाठी सर्व विभागांनी समन्वयाने काम करण्याचे निर्देश दिले. वैयक्तिक लाभार्थी योजनांमधून पात्र नागरिकांना अधिकाधिक लाभ मिळवून द्यावा.

विविध विभागांनी रिक्त पदांची स्थिती तपासून आवश्यक मागणीपत्रे महाराष्ट्र लोकसेवा आयोगाकडे पाठवावीत. त्याचबरोबर बिंदुनामावली अद्ययावत करण्याची कार्यवाही प्राधान्याने पूर्ण करावी, असेही त्यांनी सांगितले.

## जाहीर नोटीस

**बॉम्बे रेग्युलेशन ८, १८२७ अन्वये वरुड येथील श्री.व्ही.व्ही.राजुरकर, दुसरे सहदिवाणी न्यायाधीश ( प्रभारी ) ( कनिष्ठ स्तर ) वरुड यांचे न्यायालयात**

**एम.जे.सी.क्रं.८०४/२०२६** **ने.ता.२६/१०/२०२६**

**अर्जदार :-**

१) गुंफाबाई भाऊराव पोकळे, वय अं.६५ वर्ष, धंदा-घरकाम

२) सुरेंद्र भाऊराव पोकळे, वय अं.३७ वर्ष, धंदा- शेती

क्र.१ व २ रा.जरुड, ता.वरुड, जि.अमरावती

**... विरुध्द ...**

**गैरअर्जदार :-** **निरंक ( कोणीही नाही )**

ज्याअर्थी वरील अर्जदार यांनी **मयत भाऊराव बह्याजी पोकळे, रा.जरुड, ता.वरुड, जि.अमरावती** यांचे अर्जदार हे कायदेशीर वारसदार म्हणुन घोषित करण्याकरीता विद्यमान न्यायालयात बॉम्बे रेग्युलेशन ८, १८२७ अन्वये वारस हक्क प्रमाणपत्र मिळण्याबाबत अर्ज दाखल केला आहे.

त्याअर्थी ज्या कोणास वरील अर्जदार यांचे विरुध्द काही आक्षेप किंवा हरकत घ्यावयाची असेल तर त्यांनी नोटीस प्रसिध्दीपासुन ३० दिवसाचे आत किंवा **दि.२६/१०/२०२६** रोजी सकाळी १०.३० वाजता वरुड न्यायालयात व्यक्तिगत किंवा रितसर निर्दीष्ट केलेल्या वकीलामार्फत हजर राहावे तसे न केल्यास उक्त अर्जाची सुनावनी होवुन निकाल दिला जाईल.

आज तारीख **१५/०९/२०२६** रोजी माझे सहीने व न्यायालयाचे शिक्क्यानिशी दिले.

न्यायालयाचा शिक्का

**आदेशानुसार
सहाय्यक अधिक्षक
दिवाणी व फौजदारी न्यायालय, वरुड**

# यूपीआय शुल्क मागे घेण्याची काँग्रेसची मागणी

(प्रतिनीधी वरूड दर्पण)



**नवी दिल्ली –** पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी अमेरिकेचे अध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प यांच्यासमोर नतमस्तक होण्याचा निर्णय घेतला असून, भारताचा मोठा पैसा अमेरिकेला दिला जात आहे, असा घणाघाती आरोप काँग्रेस नेते राहुल गांधी यांनी बुधवारी केला. यासोबतच सरकारने युपीआय व्यवहारांवर लादलेले नवे शुल्क तत्काळ मागे घ्यावे अशी जोरदार मागणीही त्यांनी केली. सोशल मीडिया प्लॅटफॉर्म 'एक्स'वर पोस्ट केलेल्या एका व्हिडिओमध्ये राहुल गांधी म्हणाले, 'पंतप्रधान मोदींनी अमेरिकेसमोर झुकणे थांबवावे, स्वाभिमान दाखवावा आणि हा 'यूपीआय कर' त्वरित रद्द करावा.'

राहुल गांधींनी आपल्या व्हिडिओत माजी पंतप्रधान इंदिरा गांधी यांच्या एका वक्तव्याचा उल्लेख केला. ते म्हणाले, 'इंदिराजींना एकदा विचारण्यात आले होते की त्या डाव्या विचारसरणीच्या आहेत की उजव्या, त्यावर त्या म्हणाल्या होत्या, 'मी डावीकडे झुकत नाही, उजवीकडेही झुकत नाही; मी थेट सरळ उभी राहते.'

# ११ रुपयांचा खत सेट तब्बल ३२५ रुपयांना! वैद्यकीय उपकरणांवर तब्बल २,८४१ टक्के नफा, तुकाराम मुंढे यांचे केंद्रीय यंत्रणांना पत्र

(प्रतिनीधी वरूड दर्पण)



***मुंबई –*** वैद्यकीय उपकरणांच्या मूळ खरेदी किमती आणि त्यावर छापलेली कमाल विक्री किंमत यांमध्ये प्रचंड तफावत असल्याचे 'महाराष्ट्र अन्न व औषध प्रशासना'च्या बाजार पाहणीत उघडकीस आले आहे.

एका प्रकरणात ही नफ्याची टक्केवारी तब्बल २,८४१.१७ टक्क्यांपर्यंत पोहोचल्याचे समोर आले आहे.

या पार्श्वभूमीवर, आवश्यक वैद्यकीय उपकरणांच्या किमती रास्त करण्यासाठी आणि दरांचे नियमन करण्यासाठी 'एफडीए' आयुक्त तुकाराम मुंढे यांनी केंद्र सरकारच्या 'औषध निर्माण विभाग' आणि 'राष्ट्रीय औषध मूल्य निर्धारण प्राधिकरणाला' पत्र लिहून हस्तक्षेप करण्याची मागणी केली आहे.

'एफडीए' अंतर्गत काम करणाऱ्या 'महाराष्ट्र राज्य मूल्य देखरेख संसाधन युनिट' ने रुग्णालयांत दाखल रुग्णांसाठी उपचारादरम्यान लागणाऱ्या चार प्रमुख श्रेणींमधील उपकरणांचे सर्वेक्षण केले होते.

# सेवा संकल्प अभियानाची प्रभावी अंमलबजावणी करावी : जिल्हाधिकारी आशिष येरेकर

(प्रतिनीधी वरूड दर्पण)



**अमरावती –** नागरिकांच्या सोयीसाठी आणि गरजूंना लाभ देण्यासाठी सेवा संकल्प अभियान राबविण्यात येत आहे. प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांच्या संसदीय कार्यकाळाला २५ वर्षे पूर्ण झाल्यानिमित्ताने हे अभियान एक महिनाभर राबविण्यात येणार आहे. नागरिकांच्या जीवनात बदल घडून येईल, अशा योजना या अभियानात राबविण्यात यावा, तसेच अभियानाची प्रभावी अंमलबजावणी करावी, असे निर्देश जिल्हाधिकारी आशिष येरेकर यांनी दिले.

जिल्हाधिकारी कार्यालयात सेवा संकल्प अभियानामध्ये आयोजित करण्यात येणाऱ्या विविध उपक्रमांचा आढावा घेण्यात आला. यावेळी मुख्य कार्यकारी अधिकारी सत्यम गांधी, निवासी उपजिल्हाधिकारी संतोष काकडे, अतिरिक्त मुख्य कार्यकारी अधिकारी विनय ठमके आदी उपस्थित होते.

जिल्हाधिकारी येरेकर यांनी, जिल्ह्यात प्रामुख्याने वन हक्क पट्टे वाटपाचा कार्यक्रम धारणी आणि चिखलदरा तालुक्यात प्राधान्याने राबविण्याचे निर्देश दिले. दि.१७ ते १९ सप्टेंबरदरम्यान प्रत्येक गावात सभा घेऊन वनपट्टे वाटप निश्चित करावे. त्यानंतर दि.२० सप्टेंबरपासून प्रत्यक्ष कारवाई करावी. ग्रामसभा, उपविभाग आणि जिल्हास्तरीय समितीची मंजुरी घेऊन या अभियानात पट्टेवाटप अंतिम करण्यात यावे. तसेच नव्याने तयार करण्यात आलेला सात ई आणि बारा ईबाबत कार्यवाही करण्यात यावी.

युवकांसाठी २९ सप्टेंबर रोजी सर्व तालुक्यात रोजगार मेळावे आयोजित करण्यात येणार आहे. यात १८०० जागा भरण्यात येणार असून यासाठी ५६ कंपन्यांनी नोंद केली आहे. आतापर्यंत ५ हजार युवकांनी यासाठी नोंदणी केली आहे. त्यासोबतच समाज कल्याण आणि आदिवासी विकास विभागाच्या वसतिगृहात करीअर मार्गदर्शन करण्यात येणार आहे. कामगार विभागातर्फे असंघटीत कामगारांसाठी ई-श्रम पोर्टलवर नोंदणी करण्यात येणार आहे. त्यांच्यासाठी आरोग्य शिबीर, विमा आदी उपक्रम राबविण्यात येणार आहे. या क्षेत्रात काम करणाऱ्या कामगारांना बँकेत पगार करण्यासाठी प्रयत्न करण्यात येणार आहे. अभियान विविध विभागांच्या समन्वयातून राबविण्यात येणार आहे. सर्व विभागांची जबाबदारीने कार्यक्रमाचे नियोजन करून राबवावे, तसेच याचा अहवाल सादर दर आठवड्याला सादर करावा, असे निर्देश जिल्हाधिकारी येरेकर यांनी दिले.

# तृतीयपंथीयांना घर नाकारले तर कारवाई : राज्य सरकारचा इशारा

(प्रतिनीधी वरूड दर्पण)



***मुंबई –*** समाजात सन्मानाने वागणूक मिळावी यासाठी तृतीयपंथी आजही लढा देत आहेत. त्यात आता तृतीयपंथीयांना घरासाठी संघर्ष करावा लागत असल्याचे वास्तव समोर आले आहे. मात्र, आता तृतीयपंथींना घर नाकारणे महागात पडणार आहे. तृतीयपंथीयांच्या तक्रारींची राज्य सरकारने गंभीर दखल घेतली असून हक्काच्या घरासाठी भेदभाव खपवून घेणार नाही, असा इशारा राज्य सरकारने गृहनिर्माण संस्था, सोसायट्यांना दिला आहे. विभागीय ट्रान्सजेंडर व्यक्ती संरक्षण व कल्याण मंडळाच्या सहअध्यक्षा सोनाली चौकेकर यांनी मुंबई विभागाचे विभागीय सहनिबंधक शहाजी पाटील यांच्याकडे केलेला अर्ज हा तृतीयपंथीय व्यक्तींच्या मूलभूत हक्कांचे संरक्षण करण्यासाठी उचललेले एक अत्यंत महत्त्वाचे पाऊल आहे. या अर्जाचा मुख्य हेतू गृहनिर्माण क्षेत्रात तृतीयपंथीय व्यक्तींना येणाऱ्या अडचणी दूर करणे आणि त्यांना सन्मानाने जगू देणे हा आहे.

# युवकाची गळफास घेवुन आत्महत्या : टेंभुरखेडा येथील घटना

(प्रतिनीधी वरूड दर्पण)



**वरूड –** येथुन जवळच असलेल्या टेंभुरखेडा येथील ३० वर्षीय युवकाने गळफास घेवुन आत्महत्या केल्याची घटना आज सकाळच्या सुमारास उघडकीस आली.

संदीप साहेबराव पांडे असे आत्महत्या केलेल्या युवकाचे नांव आहे. आज सकाळच्या सुमारास तो झोपेतून उठला आणि शेतात कामाला जाण्याची तयारी करण्याच्या बेतात असतांना सकाळच्या सुमारास त्याने राहते घरी गळफास घेतला. शेतामध्ये कामाकरीता जाण्याकरीता तुषार लुंगे हे संदीप याला आवाज देण्याकरीता आले असता संदीप त्यांना गळफास घेतलेल्या स्थितीत आढळुन आला. त्यानंतर नातेवाईक आणि पोलिसांना माहीती देण्यात आली.

पोलिसांनी तातडीने घटनास्थळ गाठुन घटनास्थळाचा पंचनामा करुन मृतदेह उत्तरीय तपासणीकरीता ग्रामीण रुग्णालयात रवाना केला.

संदीप याने आत्महत्या का केली? याबाबत वृत्त लिहीस्तोवर माहीती मिळु शकली नाही. संदीपच्या मागे वडिल, भाऊ, बहिण असा परिवार असून तो अविवाहित होता. वरुड पोलिसांनी यासंदर्भात आकस्मिक मृत्यूची नोंद केली आहे. पुढील तपास ठाणेदार अशोक जाधव यांचे मार्गदर्शनाखाली मिनेश खांडेकर करीत आहे.

## तापमान

| | कमाल | किमान |
|---|---|---|
| अमरावती | २९ | २४ |
| यवतमाळ | २८ | २१ |
| अकोला | २७ | २४ |
| वाशिम | २८ | २३ |
| बुलढाणा | २७ | २२ |
| वर्धा | ३० | २३ |
| नागपूर | २९ | २४ |
| चंद्रपुर | २९ | २५ |
| गडचिरोली | २८ | २३ |







